दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २०८ I मंगळवार १२ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



## आता तुम्ही कशाला ह्या संसारात आला ?


'सहजयोग'
भाग ५०

तर परमेश्वराला जाणण्यासाठी ! परमेश्वराने ही सर्व सृष्टी केली, तुम्हाला सगळं काही दिलं, शेवटी एवढ्यासाठी की तुमच्यामध्ये सुजाणता यावी, तुमच्यामध्ये धर्म यावा आणि नंतर तुम्ही त्या धार्मिक स्थितीमध्ये परमेश्वराशी एकात्म व्हा. केवळ या जीवाचा आणि आत्म्याचा संबंध होतो. तुम्ही त्या परम पित्या परमात्म्याच्या साम्राज्यात प्रवेश करावा म्हणूनच परमेश्वराने ही सगळी रचना केलेली आहे आणि तो आतुरतेने तुमची वाट बघतो आहे की हे कधी माझ्याकडे येणार, पण तुम्ही पैसे मिळाले म्हणून इकडे बहकले, सत्ता मिळाली म्हणून तिकडे बहकले. तुमच्याजवळ एवढासुद्धा वेळ नाही की तुम्ही दोन मिनिटं परमेश्वराच्याबद्दल विचार कराल.पाश्चिमात्य देशातील लोकांनी सगळे हेच प्रकार केले. रात्रं- दिवस धडपड करून हे कर रे, ते कर रे, पैसे एकत्र कर रे, काय काय त्यांना जे करायचे ते करून शेवटी काय झालं? त्यांच्या मुलांनी आपल्या आई-वडिलांचं घर सोडलं. तुम्ही सांभाळा ते आणि ते लागले आपल्या मार्गाला आणि ते कुठे जाऊन पोहोचले तर त्यांनी हे सगळं तऱ्हेतऱ्हेच्या व्यसनांची सुरुवात केली. आता तुम्हालाही त्या रस्त्याने जायचे असले तर जा. त्याला कोणी काही मना करू शकत नाही. तुम्ही म्हणाल की आम्हाला नरकात जायचंय तर जा. सरळ जाऊ शकता. पण जर तुम्ही समजलात की, 'मी कोण आहे? कशासाठी आलो आहे या जगात? मला काय काय करायचे आहे ? आणि माझी काय स्थिती आहे, वस्तुस्थिती काय आहे ?' हे जर तुमच्या लक्षात आलं तर मात्र तुम्ही अधोगतीला न जाता सहजयोगाकडे याल.

– ०३ फेब्रुवारी १९८२ राहुरी अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी


# पश्चिम आशियातील युद्धसंकटाची झळ...
# देशात पुन्हा लॉकडाऊन ?

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील वाढत्या युद्धसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना इंधन, सोने आणि परकीय चलनाची बचत करण्याचे मोठे आवाहन केले आहे. हैदराबाद येथे ९३७७ कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांच्या उद्घाटनावेळी बोलताना मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याबरोबरच पुढील एक वर्ष सोन्याची खरेदी टाळण्याचे आवाहन केले. नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारने एक आढावा बैठक घेतली. या बैठकीत युद्ध भडकल्यास देशात करावयाच्या उपाय योजनेवर चर्चा करण्यात आली. त्यामुळे पश्चिम आशियातील युद्ध स्थितीचा फटका भारताला बसून देशात पुन्हा 'लॉकडाऊन'ची वेळ येणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

### इराणमधून २५४९ भारतीय मायदेशी

**पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणमधून आतापर्यंत २५४९ भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी आणण्यात आले आहे. परराष्ट्र मंत्रालयाकडून २४ तास परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून भारतीयांना सध्या इराणचा प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.**



आखाती देशांतील तणावामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होत असून जगभरात इंधन दर वाढले आहेत. भारत मोठ्या प्रमाणावर पेट्रोलियम पदार्थ आयात करत असल्याने नागरिकांनी गरजेनुसारच इंधनाचा वापर करावा, असे मोदी म्हणाले. त्यांनी मेट्रो, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन बैठका आणि परकीय वस्तूंच्या खरेदीत कपात करण्याचाही सल्ला दिला. दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारच्या मंत्रिगटाची बैठक पार पडली. या बैठकीत एलपीजी, पेट्रोल, डिझेल आणि खतांच्या पुरवठ्याचा आढावा घेण्यात आला. सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे राजनाथ सिंह यांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय विषयांचे अभ्यासक शैलेंद्र देवळाणकर यांनी मोदींच्या आवाहनाला योग्य वेळेचे आणि सयुक्तिक असल्याचे म्हटले आहे. आखातातील संघर्ष आणखी चिघळल्यास तेल खरेदीसाठी डॉलरचा मोठा वापर करावा लागेल. त्यामुळे परकीय चलन वाचवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



### पंतप्रधानांच्या अपयशाची कबुली : राहुल गांधी

**देशाला अशा वळणावर आणले आहे की, आता जनतेला काय खरेदी करावे आणि काय टाळावे हे सांगावे लागत आहे. प्रत्येक वेळी स्वत:ची जबाबदारी झटकून दोष जनतेवर टाकला जातो. हे उपदेश नसून गेल्या १२ वर्षांच्या अपयशाची कबुली आहे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.**



## 'ट्रॅव्हल्स जिहाद' विरोधात हिंदूंचा कायनेटिक चौकात रास्तारोको

### आ. जगताप आक्रमक : छेडछाड करणाऱ्या कंडक्टरविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगरमध्ये लव, लँड आणि व्होट जिहाद पाठोपाठ आता 'ट्रॅव्हल्स जिहाद' प्रकार वाढले आहेत. त्यामुळे महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. या विरोधात सर्व हिंदू महिला नागरिकांनी जागरूक होणे गरजेचे आहे. आता हे सहन न करता जशास तसे उत्तर देण्याची वेळ आली आहे. असा स्पष्ट इशारा आमदार संग्राम जगताप यांनी दिला. नगर-पुणे शिवशाही बसमध्ये मुस्लिम कंडक्टरने एका हिंदू महिलेची छेड काढण्याचा सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल झाल्याने आमदार संग्राम जगताप हे चांगलेच आक्रमक झाले. लव जिहाद, लँड जिहाद, आणि आता नव्या ट्रॅव्हल जिहाद विरोधात सकल हिंदू समाजाच्या वतीने सोमवारी सकाळी कायनेटिक चौकात सुमारे एक तास रास्ता रोको आंदोलन केले. रणरणत्या उन्हात तापलेल्या रस्त्यावर शेकडो हिंदू महिलांसह नागरिकांनी उस्फुर्तपणे रस्ता रोको आंदोलनात सहभाग घेतला. हिंदू प्रवासी महिलेची छेड काढणाऱ्या मुस्लिम कंडक्टरवर जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही व त्याची प्रत आम्हाला प्राप्त होत नाही. तोपर्यंत रस्त्यावरून उठणार नाही व आंदोलन मागे घेणार नाही. असा आक्रमक पवित्रा आमदार संग्राम जगताप यांनी घेतल्यावर पोलीस प्रशासनाची चांगली धावपळ उडाली. सुमारे एक तासानंतर पोलिसांनी संबंधित कंडक्टरवर गुन्हा दाखल केला व त्याची प्रत आमदार जगताप संग्राम जगताप यांना दिल्यानंतर हे रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले. (पान ४ वर)

### महत्वाचे..

**देवस्थान इनामी जमिनी वहिवाटदारांच्या होणार मालकीच्या!**

मुंबई : देवस्थानच्या जमिनीच्या मालकीचा वाद मिटविण्यासाठी सरकारने आता नवीन धोरण आखले असून त्यासाठी महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मुलनचा कायदा येत्या पावसाळी अधिवेशनात करण्यात येणार आहेत. महसूल विभागाने या कायद्याच्या प्रारुपावर जनतेच्या हरकती सूचना मागविल्या असून ५ जूनपर्यंत विधेयकातील तरतूदींवर आक्षेप घेता येतील. या जमीनी पुजारी, वहिवाटदार किंवा मिरासदार यांच्या कायमस्वरुपी मालकीच्या केल्या जाणार असून त्यासाठी सबंधितांकडून रेडीरेकनर प्रमाणे मुल्य घेतले जाणार आहे. प्रस्तावित महाराष्ट्र इनाम देवस्थान निर्मुलन कायद्यान्वये धार्मिक किंवा धर्मादाय संस्थाकडे असलेली इनामे खालसा करण्यात येणार हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने नाहिसे करण्याचा अधिनियम, हैद्राबाद अतियात चौकशी अधिनियम आणि वक्फ अधिनियम या कायद्यांच्या व्याप्तीखाली येणाऱ्या जमीनींना महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मुलनचा कायदा लागू होणार नाही.

## बचत गटाच्या महिला कर्ज भरतात, सोसायटीवाले थकवतात : ना. विखे पाटील


( छाया : परेश कापसे )

> अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये महिला बचत गटांनी निर्मिती केलेल्या खाद्यपदार्थ तसेच विविध वस्तूंची विक्री वेगवेगळ्या दुकानांमार्फत केली जाते का? याचे सर्वेक्षण करायला हवे. जनसेवा फाउंडेशन तसेच महिला बालकल्याण विभागाने त्यासाठी पुढाकार घेऊन एक योजना बनवावी. प्रारंभी त्याचे सर्वेक्षण करून आम्हाला सूचना द्या. राज्य शासनाच्या वतीने महिला बचत गटांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी विशेष नियमावली तयार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल. प्रत्येक दुकानातून सुमारे ५० टक्के महिला बचत गटांची पदार्थ विक्री व्हायला हवेत.
> **– राधाकृष्ण विखे पाटील, जलसंधारणमंत्री**

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** बचत गटाच्या माध्यमातून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. स्वत:चे उद्योग व्यवसाय उभारत कुटुंबासह गावाच्या, राज्याच्या आर्थिक विकासाला हातभार लावतात. बचत गटाच्या माध्यमातून घेतलेले कर्ज महिला कधीच थकवत किंवा बुडवत नाही, ते शंभर टक्के व सुरू होते. सोसायटीच्या माध्यमातून दिलेले कर्ज मात्र ८० टक्के परत येण्याची खात्री नसते. नंतर कर्जमाफीची मागणी केली जाते. बचत गटाच्या बाबतीत तसे होत नाही म्हणून महिलांचे विशेष करून मी अभिनंदन करतो, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शासकीय योजनेतून महिला बचत गटांना कर्ज वाटपाचे धनादेश प्रधान करण्याचा कार्यक्रम पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पार पडला. शहरातील उत्सव मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास भाजप नेते दीपक पटारे, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, नगरपालिकेतील गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेविका स्नेहल खोरे, माजी उपनगराध्यक्ष संजय फंड, नगरसेवक श्रीनिवास बिहानी, आशिष धनवटे, ज्येष्ठ नेते नानासाहेब पवार, पोपटराव जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य शरद नवले, माजी नगरसेवक रवींद्र गुलाटी, संजय छल्लारे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते. बचत गटाच्या महिलांना विविध उद्योगासाठी कर्ज वितरण तसेच कृषी खात्याच्या योजनेतून घेण्यात आलेले ट्रॅक्टर व हार्वेस्टर यांचे वितरण यावेळी विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महिला आर्थिक सक्षम होणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना सुरू केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला सक्षमीकरणासाठी देशात वेगवेगळ्या योजना सुरू केल्या. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शालिनीताई विखे यांनी साई ज्योती महिला बचत गटांचे प्रदर्शन सुरू केले. त्यामुळे महिलांना एक व्यासपीठ मिळाले. आता प्रत्येक शहरात, गावामध्ये, मॉलमध्ये महिला बचत गटांनी निर्मिती केलेल्या उत्पादनांची विक्री प्राधान्याने करायला पाहिजे. नगरसेवक, तसेच भाजप पदाधिकाऱ्यांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. गायत्री मस्के यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले


## मायलेकाचे मृतदेह आढळले


हत्या की आत्महत्या?

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील तरडगाव शिवारात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.दत्तोबा ढाळे यांच्या विहिरीमध्ये मायलेकाचे मृतदेह आढळल्याने संपूर्ण जामखेड तालुक्यात खळबळ उडाली आहे. शाळू शिवाजी चौरे (वय २२) आणि तिचा दीड वर्षाचा मुलगा विवांश शिवाजी चौरे अशी मृतांची नावे आहेत. या घटनेमुळे तरडगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

याबाबत समजलेली माहिती अशी की, वंजारवाडी येथील बिभीषण तांदळे (वय ५९) यांनी खर्डा पोलीस स्टेशनला दिलेल्या माहितीनुसार, त्यांची पत्नी आणि नातू हे १० मे पासून बेपत्ता होते. शोध सुरू असतानाच, आज ११ मे सकाळी आकरा वाजेच्या सुमारास तरडगाव येथील दत्तोबा ढाळे यांच्या विहिरीत दोघांचेही मृतदेह तरंगताना आढळून आले.घटनेची माहिती मिळताच खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत व सहाय्यक फौजदार (पान ४ वर)


सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि
सहकार क्षेत्रात भरीव कार्य करणारे,
दूरदृष्टी, सुसंस्कृती व समाजभान आमचे दैवत

**आदरणीय श्री. यशवंतरावजी गडाख साहेब**
**यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा !**

- शुभेच्छुक -

भानसहिवरा, उस्थळदुमाला परिसर कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी वर्ग
**माजी मंत्री श्री. शंकरराव गडाख पाटील मित्र मंडळ**

जाहिरात संकलन : सुधीर चव्हाण, नेवासा तालुका प्रतिनिधी, मो. ८८८८२१३५११


## प्रशासक सरपंच नामधारी..!
# न्यायालयाच्या निर्बंधामुळे ग्रामपंचायतींचा आर्थिक कारभार ठप्प!

भरत थोरात I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** राज्यातील मुदत संपलेल्या जवळपास १४ हजारांहून अधिक ग्राम पंचायतींवर शासनाने सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त केले आहे. मात्र उच्च न्यायालयाने दैनंदिन वीज, पाणी, स्वच्छता आणि आरोग्य सेवांव्यतिरिक्त इतर आर्थिक व्यवहार करण्यावर निर्बंध घातल्याने ग्राम पंचायतींचा आर्थिक कारभार ठप्प झाला असून विकासकामांवर त्याचा मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाने या प्रश्नावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी अखिल भारतीय सरपंच परिषदेने केली आहे.




राज्यातील अनेक ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर शासनाने अधिसूचनेद्वारे सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त केले होते. मात्र या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांनंतर न्यायालयाने आर्थिक व्यवहारांवर (पान ४ वर)

### तातडीने कोंडी सोडवावी

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर शासनाने सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त केले. मात्र न्यायालयाच्या आदेशामुळे मोठे आर्थिक व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे सरपंचांची कोंडी झाली असून स्थानिक विकासकामे ठप्प झाली आहेत. ग्रामपंचायतींचा आर्थिक कारभार पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने तातडीने कोंडी सोडवावी.

**– जयंत पाटील कुर्दुकर**
अध्यक्ष- अखिल भारतीय सरपंच परिषद

### अधिकार द्या, अन्यथा सरपंच पद काढून घ्या

सरपंच पदाच्या कार्यकाळात जी कामे पूर्ण झाली, त्या ठेकेदारांची बिले अडकली. कर्मचाऱ्यांचे पगार, पाईपलाईन किंवा लाईट दुरुस्ती बिले देण्यासाठी देखील अडचण येते. ग्रामपंचायतीला घरकुलांसाठी शेती महामंडळाची जागा मिळाली. त्या जागेची साफसफाई करणे लेआउट मंजूर करून घेणे आधी प्रक्रिया बाकी आहे. परंतु भांडवला अभावी काही काम करता येत नाही. नामधारी प्रभारी सरपंच करून अधिकार नसल्याने ग्रामस्थांचा रोष पत्करावा लागत आहे. शासनाने एक तर खर्चाचे अधिकार द्यावेत अन्यथा दिलेले प्रभारी सरपंच पद काढून घ्यायला हवे.

**– किशोर बनकर**
प्रभारी सरपंच : पढेगाव, ता. श्रीरामपूर

# संयम, स्वावलंबन आणि जबाबदारीची खरी परीक्षा

संपादकीय

पश्चिम आशियामध्ये वाढत चाललेला संघर्ष आता केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित राहिलेला नाही. इराण, इस्रायल आणि आखाती देशांमधील तणावाचा परिणाम संपूर्ण जगाच्या अर्थकारणावर होत असून भारतासारख्या विकसनशील देशांसमोरही मोठे आव्हान उभे ठाकले आहे. कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये होत असलेली वाढ, पुरवठा साखळीवरील ताण, डॉलरची वाढती मागणी आणि परकीय चलनावरील दबाव या सर्व गोष्टी भारताच्या आर्थिक स्थैर्यासाठी धोक्याच्या घंटा ठरत आहेत. अशा पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना इंधन बचत, सोन्याची खरेदी टाळणे, परदेश प्रवास कमी करणे आणि स्वदेशीला प्राधान्य देण्याचे केलेले आवाहन हे केवळ राजकीय विधान नसून संभाव्य आर्थिक संकटाची पूर्वसूचना मानावी लागेल.

मोदी यांनी केलेली नऊ आवाहने पाहिली तर त्यामागे केवळ काटकसरीचा संदेश नाही, तर ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक स्वावलंबनाचा स्पष्ट विचार दिसून येतो. भारत आपल्या गरजेपैकी मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करतो. तेल आणि सोन्याचा व्यवहार प्रामुख्याने अमेरिकन डॉलरमध्ये होतो. त्यामुळे जागतिक संघर्ष वाढला आणि तेलाचे दर आणखी वाढले, तर भारताचा परकीय चलन साठा वेगाने कमी होऊ शकतो. त्यामुळेच इंधनाचा संयमी वापर, परकीय वस्तूंवरील अवलंबित्व कमी करणे आणि सोन्याच्या आयातीत बचत करणे, ही काळाची गरज ठरते.

आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक शैलेंद्र देवळाणकर यांनी व्यक्त केलेली चिंता याच वास्तवाकडे लक्ष वेधते. स्ट्रेट ऑफ होर्मुझ हा जगातील अत्यंत महत्त्वाचा सागरी मार्ग आहे. जगातील मोठ्या प्रमाणावरील तेलवाहतूक या मार्गातून होते. आज जर तेथून केवळ दहा टक्के जहाजे प्रवास करत असतील, तर परिस्थिती किती गंभीर आहे याची कल्पना येते. युद्धाचा विस्तार झाला तर तेलाचा पुरवठा खंडित होऊ शकतो आणि त्याचे थेट परिणाम भारतासारख्या आयातदार देशांवर होतील. त्यामुळेच मोदींचे आवाहन हे भावनिक नसून आर्थिक वास्तवावर आधारित असल्याचे मान्य करावे लागेल.

मात्र या संपूर्ण प्रकरणात राजकीय आरोप-प्रत्यारोपही सुरू झाले आहेत. राहुल गांधी यांनी मोदींच्या विधानावर टीका करत हे उपदेश नसून सरकारच्या अपयशाची कबुली आहे, असे म्हटले. विरोधक म्हणून सरकारला प्रश्न विचारणे योग्यच आहे; पण प्रत्येक राष्ट्रीय संकटाकडे केवळ राजकीय नफ्या-तोट्याच्या चष्म्यातून पाहणेही धोकादायक ठरू शकते. जागतिक युद्धजन्य परिस्थिती ही केवळ एका सरकारच्या धोरणामुळे निर्माण झालेली नाही. रशिया-युक्रेन युद्धानंतर जग आधीच अस्थिर झाले होते. आता पश्चिम आशियातील संघर्षाने त्यात अधिक भर घातली आहे. अशा वेळी सरकारने नागरिकांना संभाव्य संकटाची कल्पना देणे आणि बचतीचे आवाहन करणे यात चुकीचे काही नाही.




युद्धाचे परिणाम केवळ पेट्रोल-डिझेलपुरते मर्यादित राहत नाहीत. खतांच्या किमती, वाहतूक खर्च, महागाई, अन्नधान्याचे दर आणि उद्योग क्षेत्रावर त्याचा थेट परिणाम होतो. केंद्र सरकारने ऊर्जा पुरवठा आणि आवश्यक वस्तूंच्या उपलब्धतेसाठी मंत्रिगटाची बैठक घेणे, पुरवठा साखळीवर लक्ष ठेवणे आणि परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणे हे सकारात्मक पाऊल म्हणावे लागेल. राजनाथ सिंह यांनी नागरिकांना घाबरून न जाण्याचे केलेले आवाहनही महत्त्वाचे आहे. कारण अशा काळात अफवा, भीती आणि अनावश्यक खरेदीमुळे परिस्थिती अधिक बिकट होऊ शकते.

इराणमधून २५०० हून अधिक भारतीयांना सुरक्षितपणे मायदेशी आणण्यात आले, ही बाबही भारताच्या सजग परराष्ट्र धोरणाची साक्ष देते. आखाती देशांमध्ये लाखो भारतीय रोजगारासाठी कार्यरत आहेत. युद्धाचा विस्तार झाल्यास त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर ठरू शकतो. त्यामुळे सरकारने विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करून परिस्थितीवर लक्ष ठेवणे, हे आवश्यक होते.

या संपूर्ण परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांची भूमिकाही महत्त्वाची आहे. इंधन बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्थानिक उत्पादनांना प्राधान्य, अनावश्यक खर्च टाळणे आणि ऊर्जा वापराबाबत जबाबदारीची भावना ठेवणे ही आता केवळ वैयक्तिक नव्हे तर राष्ट्रीय जबाबदारी बनली आहे. कोरोना काळात भारतीयांनी संयम आणि शिस्त दाखवली होती. त्याच पद्धतीने आर्थिक आणि ऊर्जा सुरक्षेच्या या संकटातही सामूहिक जबाबदारीची गरज आहे.

भारत आज जगातील मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. मात्र जागतिक संघर्ष, ऊर्जा संकट आणि आर्थिक अस्थिरता या आव्हानांचा सामना करताना आत्मनिर्भरतेचा मार्ग अधिक मजबूत करावा लागेल. सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन आणि स्थानिक उत्पादन यांना प्रोत्साहन देणे ही आता पर्यायाची नव्हे तर गरजेची बाब आहे.

पश्चिम आशियातील युद्धाचे ढग अजून दूर गेलेले नाहीत. त्यामुळे पुढील काही महिने भारतासाठी अत्यंत निर्णायक ठरू शकतात. अशा वेळी सरकार, विरोधक आणि नागरिक यांनी परस्परांवर आरोप करण्यापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणे अधिक आवश्यक आहे. संकटाच्या काळात संयम, स्वावलंबन आणि जबाबदारी हाच देशाला सुरक्षित ठेवण्याचा सर्वात मोठा मार्ग ठरतो.

## कांदा-लसूण विषयावर महात्मा फुले कृषी विद्यापीठात १७ वी राष्ट्रीय वार्षिक बैठक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी (प्रतिनिधी) :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. नानासाहेब पवार सभागृहात दि. १२ व १३ मे २०२६ रोजी कांदा आणि लसूण पिकांवरील १७ व्या राष्ट्रीय वार्षिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील विविध राज्यांतील नामवंत शास्त्रज्ञ या बैठकीत सहभागी होणार आहेत.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्लीचे सहाय्यक महासंचालक डॉ. सुधाकर पांडे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यावेळी डॉ. के. ई. लवांडे, डॉ. राम दत्ता, संशोधन संचालक डॉ. पी. एस. बोडके तसेच उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील उपस्थित राहणार आहेत.

देशातील १४ राज्यांतील ७० हून अधिक कांदा-लसूण तज्ज्ञ शास्त्रज्ञ या दोन दिवसीय बैठकीत सहभागी होणार आहेत. मागील वर्षभरातील संशोधन कार्याचा आढावा घेणे व आगामी वर्षाचे नियोजन करणे, हा बैठकीचा मुख्य उद्देश आहे.

बैठकीत नवीन वाण संशोधन, प्रसारण, प्रायोगिक चाचण्यांचे निष्कर्ष, कांदा बीजोत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञान, हवामान बदलांना तोंड देणाऱ्या स्मार्ट जनुकीय वाणांचा विकास आणि जमिनीचे आरोग्य सुधारणा यावर चर्चा होणार आहे. विविध प्रकाशनांचे विमोचनही करण्यात येणार आहे.

या बैठकीतून प्रयोगशाळेतील संशोधन थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचण्यास मदत होऊन भारतीय कृषी क्षेत्र अधिक सक्षम व आत्मनिर्भर होण्यास चालना मिळणार आहे.

## दिवसा वीज नसल्याने उष्णतेचा कहर

### रात्री शेतीपंपासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांवर दुहेरी संकट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्याच्या पश्चिमेकडील डोंगरपट्ट्यातील अनेक गावांमध्ये दिवसा वीजपुरवठा खंडित राहत असल्याने नागरिकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत आहे. वाढत्या तापमानामुळे घरात बसणेही कठीण झाले असून ग्रामस्थ हैराण झाले आहेत. महावितरणकडून काही गावांना रात्रीच्या वेळेत थ्री-फेज वीजपुरवठा दिला जात असल्याने दिवसभर सिंगल फेज व थ्री-फेज वीज बंद ठेवली जात आहे. त्यामुळे घरातील पंखे, कुलर, एसी, टेबल फॅन यांसारखी उपकरणे बंद पडत असून नागरिकांना उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ज्या गावांना दिवसा थ्री-फेज वीज उपलब्ध आहे, तेथे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळत असला तरी रात्री वीज मिळणाऱ्या गावांतील शेतकऱ्यांना शेतपंप सुरू करण्यासाठी रात्री शेतात जावे लागत आहे. परिसरात बिबट्यांचा मुक्त संचार वाढल्याने शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही भागात यापूर्वी बिबट्यांच्या हल्ल्यांच्या घटनाही घडल्या असल्याने भीतीचे वातावरण आहे.

एकीकडे प्रचंड उष्णता आणि दुसरीकडे रात्री जीव धोक्यात घालून शेतीपंप चालविण्याची वेळ आल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. महावितरणने किमान दिवसा सिंगल फेज वीजपुरवठा सुरू ठेवावा तसेच शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्यातून दिलासा मिळेल व शेतकऱ्यांना रात्री शेतात जाण्याचा धोका टळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ओंकारच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करा; प्रभावती घोगरे यांची ठाम भूमिका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** शहरातील १३ वर्षीय ओंकार गायकवाड यांच्या मृत्यूने संपूर्ण परिसर शोकमग्न झाला आहे.या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे.कुटुंबीयांनी व्यक्त केलेल्या संशयानुसार प्रकार केवळ अपघात नसून घातपात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र अस्वस्थता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस प्रभावती घोगरे यांनी दुःखकित गायकवाड कुटुंबियांची प्रत्यक्षरित्या भेट घेऊन सांत्वन केले. त्या कुटुंबीयांचे दुःख समजून घेत त्यांना धीर दिला, न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील,असे आश्वासन दिले.यावेळी घोगरे यांनी पोलीस प्रशासनाकडे ठोस मागण्या मांडत या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी तात्काळ करण्यात यावी, दोषींवर कठोर कारवाई करावी, असे स्पष्टपणे सांगितले. तसेच परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर त्वरित बंदी घालून नशेखोर व गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.या सोबतच राहाता तालुक्यात वाढत चाललेली गुंडगिरी, दहशतीचे वातावरण आणि असामाजिक घटकांचा वाढता प्रभाव याकडेही त्यांनी गांभीर्याने लक्ष वेधले. कायदा व सुव्यवस्थेचा धाक कमी होत असल्याची चिंता व्यक्त करत राज्यकर्ते व पोलीस प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी मागणी त्यांनी केली.कायदा व सुव्यवस्था बळकट ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणेने अधिक सतर्क राहून नियमित गस्त वाढवावी, नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात,अशीही मागणी केली. याभेटी दरम्यान धनंजय गाडेकर, उत्तमराव मते, गणेश सोमवंशी यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने या घटनेची पारदर्शक चौकशी व्हावी, व कुटुंबीयांना न्याय मिळावा, अशी मागणी केली. दरम्यान, या घटनेमुळे राहाता परिसरात शोककळा पसरली असून, सत्य समोर येईपर्यंत नागरिकांचे लक्ष या प्रकरणाकडे लागून राहणार आहेत.



## सावरगावतळचा रस्ता बनला मृत्यूचा सापळा

### काम रखडल्याने ग्रामस्थ संतप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील चंदनापुरी ते सावरगावतळ या महत्त्वाच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम गेल्या जवळपास दोन वर्षांपासून सुरू असून अद्यापही अपूर्णच आहे. परिणामी रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा बनल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. या कामाचे पालकमंत्री, विद्यमान आमदार, सरपंच व स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तीन ते चार वेळा उद्घाटन झाले. मात्र प्रत्यक्षात काम संथगतीने सुरू असून ठेकेदार दोन दिवस काम करून महिनाभर गायब होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सावरगावतळ येथील युवक कार्यकर्त्यांनी ग्रामसेवक व संबंधित पदाधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. अर्धवट कामामुळे चंदनापुरी ते सावरगावतळ परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ उडत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच खड्डे, मुरूम व खराब रस्त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. तालुक्यातील अनेक विकासकामे रखडल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी टक्केवारीच्या कारणामुळे कामे थांबली असल्याची चर्चा सुरू असल्याचे म्हटले आहे. काही ठेकेदारांची देयके अडकल्यानेही कामे बंद असल्याचे सांगितले जात आहे. गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेले हे काम नेमके कधी पूर्ण होणार, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. पुढील आठ दिवसांत रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवक कार्यकर्ते व नागरिकांनी दिला आहे.

**फक्त उद्घाटने, कामांकडे दुर्लक्ष**

**संगमनेर तालुक्यात गेल्या दीड वर्षांत विविध कामांची उद्घाटने मोठ्या प्रमाणात झाली. मात्र अनेक कामे अद्याप अपूर्ण असून ग्रामीण भागात सत्ताधाऱ्यांविरोधात नाराजी वाढत असल्याची चर्चा आहे.**

## पुणतांबा मंडळातील ६८०७ शेतकऱ्यांना १२.०२ कोटी पिक विमा मंजूर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदारसंघातील पुणतांबा मंडळात मागील वर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी तब्बल १२ कोटी २ लाख रुपयांची पिक विमा नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. या अंतर्गत पुणतांबा मंडळातील सुमारे ६८०७ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत उत्पादन आधारित नुकसान भरपाई मिळणार असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.

मागील वर्षी खरीप हंगामात झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे पुणतांबा परिसरातील अनेक शेतकऱ्यांची पिके काढणीच्या टप्प्यावर असतानाच पूर्णपणे भुईसपाट झाली होती. सोयाबीन, बाजरी, कापूस, तूर, मका तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी महसूल व कृषी विभागाला सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या होत्या.त्यानंतर राज्य शासन आणि संबंधित विमा कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाले असून पुणतांबा मंडळातील ६८०७ शेतकऱ्यांसाठी १२.०२ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

आमदार आशुतोष काळे म्हणाले की, शेतकरी हा देशाचा कणा असून नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीत महायुती शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा केला. त्यातून ही मोठी मदत मंजूर झाली असून लवकरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.पिक विम्याच्या नुकसान भरपाईच्या मिळणाऱ्या रक्कमेतून अतिवृष्टीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, परिसरातील शेतकऱ्यांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.तर आ. आशुतोष काळे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषी मंत्री ना. दत्तामामा भरणे, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांचे आभार मानले आहे.



## श्री गाडगे महाराज आश्रम शाळेचा एसएससी निकाल ८७.५० टक्के

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील वळण येथील श्री गाडगे महाराज मिशन मुंबई संचलित श्री गाडगे महाराज प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळेचा एसएससी बोर्डाचा निकाल ८७.५० लागला असून यावर्षीही विद्यार्थिनींनी अव्वल यश संपादन करून श्री संत गाडगे महाराज




माध्यमिक आश्रम शाळेच्या निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणात यश संपादन करून प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. यामध्ये कुमारी सानिका संदीप आढाव ८७.४०% प्रथम क्रमांक द्वितीय क्रमांक कुमारी कल्याणी राम डमाळे ८६.००% तर तृतीय क्रमांक पायल लक्ष्मण बनकर ह्या विद्यार्थिनीने पटकाविला आहे. दिगंबर या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

या विद्यार्थिनींना माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गुजरे सर , प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. जे. माळी तर श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे खजिनदार व संचालक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल सर्व शिक्षक, शिक्षिका अधीक्षक ,अध्यक्षिका शिक्षकेतर कर्मचारी, श्री गाडगे महाराज प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळा वळण यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

## नगर – सोलापूर रोडवरील अपघात जामखेडच्या दोघांचा मृत्यू

### रुईछत्तीशी जवळ तीन मित्रांचे चारचाकी वहान पलटी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** नगर सोलापूर महामार्गावरील रुईछत्तीशी जवळील अंबीलवाडी येथील हायवेवर चारचाकी वाहन पलटी होऊन जामखेडच्या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर या आपघातात एक जण कीरकोळ जखमी झाला आहे. घटनेने जायभाय व डुचे या दोन्ही कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ॲड विराज भगवान जायभाय, वय अंदाजे २४ वर्षे रा. शिक्षक कॉलनी, व ऋषिकेश (सोनु) बाळासाहेब डुचे, वय २३ वर्षे, रा तपनेश्वर गल्ली, जामखेड अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. याबाबत मिळालेली माहिती अशी की , जामखेड येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. भगवान जायभाय यांचे सुपुत्र ॲड. विराज जायभाय हे पुणे येथील शिवाजीनगर न्यायालयात वकिली व्यवसाय करत होते. त्यांच्या मोठ्या भावाच्या विवाहासाठी ते जामखेड येथे आले होते. विवाह सोहळा आटोपल्यानंतर दि. ११ रोजी रात्री विराज जायभाय, ऋषिकेश (सोनू) डुचे व पुणे येथील एक मित्र असे तिघेजण वहान क्रमांक एम. एच १७, ए. झेड - ३२४२ या चारचाकी वहानाने अहिल्यानगर या ठिकाणी जात होते. त्यांचे वहान नगर सोलापूर महामार्गावरील रुईछत्तीशी जवळील अंबीलवाडी येथे पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास आले असता वळणावर अंदाज न आल्याने भरधाव वहानाने रस्ता सोडुन शेतात घूसली व दोन तीन पलटया मारल्या व भिषण आपघात घडला. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये विराज जायभाय व ऋषिकेश (सोनु) डुचे या दोघांचा मृत्यू झाला तर पूणे येथील त्याचा मित्र किरकोळ जखमी झाला. यानंतर किरकोळ जखमी झालेला त्यांचा मित्र हा महामार्गावर आला व नंतर जामखेड येथील त्यांच्या नातेवाईकांना फोनवर आपघाताची माहिती दिली. यानंतर बाजुच्या परीसरातील लोकांनी देखील मयत झालेल्या दोघांना बाहेर काढण्यास मदत केली. दोन्ही तरूणांच्या मृतदेहावर जामखेड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. दुपारी दोघांवर जामखेड येथील आमरधाम येथिल स्मशानभूमी मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**जामखेड येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. भगवान जायभाय यांचे सुपुत्र मयत ॲड. विराज भगवान जायभाय हे आहेत. ॲड. विराज भगवान जायभाय व ऋषिकेश (सोनु) डुचे यांना जामखेड तालुका वकील संघाने श्रद्धांजली वाहिली तसेच दुःखात सहभागी होत एक दिवस न्यायालयीन कामकाज बंद ठेवण्याचा ठराव मंजूर करून निर्णय घेतला होता.**




## ज्ञानगंगा विद्यानिकेतनचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील मांचीहिल येथील 'ज्ञानगंगा विद्यानिकेतने इयत्ता दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहिर झालेल्या निकालात नूतन दत्तात्रय जोंधळे हिने ९४.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. द्वितीय क्रमांक अंकित भगवान बोठे (९४.२० टक्के), तृतीय क्रमांक संकेत बाळासाहेब म्हसरूप (९१ टक्के) तर चतुर्थ क्रमांक राजेश्वरी दत्तात्रय शिंदे (९०.६० टक्के) यांनी मिळवला. तसेच साईश्वरी मच्छिंद्र शिंदे आणि सार्थक दत्तात्रय मुंजाळ या दोघांनीही ८९.४० टक्के गुण मिळवून संयुक्तपणे पाचवा क्रमांक पटकावला. या गुणवंतांसोबतच सिध्दी राहुल जोंधळे, अक्षय दशरथ नऱ्हे, गिरीजा विठ्ठल रासकर आणि सिध्दी किसन भाबड या विद्यार्थ्यांनीही ८७ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत विद्यालयाच्या यशाची परंपरा अधोरेखित केली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या या बॅचमधील सर्व १२२ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. एकूण



विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुणांची कमाई केली, तर २८ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक आणि ५५ विद्यार्थ्यांनी ७० टक्क्यांची ओलांडून विशेष प्राविण्य मिळवले. उर्वरित विद्यार्थ्यांमध्ये ३० जणांनी ६० टक्क्यांहून अधिक आणि ६ विद्यार्थ्यांनी ५० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून विद्यालयाच्या यशात आपला वाटा उचलला आहे. दरम्यान, या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थाप्रमुख ॲड. शाळीग्राम होडगर, संचालिका नीलिमा गुणे, विश्वस्त डॉ. शैलेंद्रसिंह होडगर आणि डॉ. दिग्विजयसिंह होडगर यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक आणि पालकांनी अभिनंदन केले आहे.

## जुन्नर लोकन्यायालयात ३६,२३९ प्रकरणांचा निपटारा

### दोन कोटींहून अधिक रकमेची वसुली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ९ मे रोजी जुन्नर न्यायालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले. या लोकन्यायालयात विक्रमी ३६,२३९ प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला. तसेच प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणांतून एकूण रु. २०,९६,०२५८ म्हणजेच दोन कोटी नव्वद लाख साठ हजार दोनशे अठावन रुपये इतक्या रकमेची वसुली करण्यात आली. या लोकन्यायालयाचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश जुन्नर, मा. श्री. एस. बी. शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. 'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेनुसार विधिसेवा प्राधिकरण आपल्यापर्यंत पोहोचत आहे. पक्षकारांनी लोकन्यायालयाच्या माध्यमातून आपली प्रलंबित प्रकरणे निकाली काढून वेळ व पैसा वाचवावा, असे आवाहन यावेळी श्री. शेलार यांनी केले. या लोकन्यायालयात दिवाणी दावे, फौजदारी दावे, बँकेची वसुली प्रकरणे, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था व फायनान्सची प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. दिवसभर चाललेल्या कामकाजात ०२ पॅनलमध्ये दोन्ही बाजूंच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून व समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातून ३६,२३९ प्रकरणे आपसी समजोत्याने निकाली निघाली. यावेळी लोकन्यायालय पॅनल प्रमुख एस. बी. शेलार, दिवाणी न्यायाधीश एस. एस. जैन, जुन्नर वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष हेमंत हडवळे, उपाध्यक्ष निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, पॅनल सदस्य ॲड. प्रविण मदगुले, ॲड. श्वेता पवार, समर्थ लॉ कॉलेजचे स्वयंसेवक विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने पक्षकार उपस्थित होते.

लोकन्यायालय यशस्वी करण्यासाठी जुन्नर वकील बार, पोलीस अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, पंचायत समिती जुन्नर, बँक, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था, फायनान्स व पक्षकार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## पटेल हायस्कूलचा एसएससी परीक्षेत डंका





**श्रीरामपूर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला व शिक्षकांच्या अथक परिश्रमाला यशाचे फळ मिळाले आहे. श्रीरामपूर येथील प्रतिष्ठित प्रेमजी रतनसी पटेल हायस्कूलने सन २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत ७३.२१ टक्के देदीप्यमान निकालाची नोंद करत आपली शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या परीक्षेत विद्यालयाचा विद्यार्थी शिवम भाऊसाहेब मोटे याने ९१.८०% गुण संपादित करून विद्यालयातून प्रथम, आदित्य गणेश चौधुर ८१.००% गुणांसह द्वितीय तर आयान यासीन शहा याने ७९.६०% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावत गुणवत्तेची परंपरा अधोरेखित केली. विद्यार्थ्यांच्या या सर्वांगीण यशामागे संस्थेचे चेअरमन संजय फंड, सेक्रेटरी महंता यादव, नारायणराव डावखर, कांतीशेठ पटेल यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन आणि मुख्याध्यापक दिलीप शेवाळे यांचे कुशल नेतृत्व लाभले आहे. यामध्ये शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान आहे. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचे श्रीरामपूर शहरासह संपूर्ण तालुक्यातून मनः पूर्वक अभिनंदन व कौतुक होत आहे.

## भोकर येथील दिव्य दयानंद स्कुलचा दहावीचा १०० टक्के निकाल



**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील दिव्य दया नंद स्कुलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून विद्यालयात प्रथम क्रमांक साई किशोर गायकवाड (९३.६०),व्दितीय श्रध्दा भाऊसाहेब मुठे (९१.४०), तृतीय वैष्णवी रमेश सरगये ( ९०.६०), चतुर्थ केतन राजेंद्र आसने (९०.४०) हे विद्यार्थी चमकले आहेत. सर्व गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक हि.कारमीना फर्नांडिस, उपमुख्याध्यापक हि.सेन्ड्रा फर्नांडिस व सर्व शिक्षक वृंद यांचे विद्यार्थी पालक व भोकर ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## ज्ञानोदय इंग्लिश स्कूलचा निकाल ८३.२२ टक्के ; आदित्य कुरुंद शाळेत प्रथम



**नेवासा** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात नेवासा येथील ज्ञानोदय इंग्लिश स्कूलने यशाची परंपरा कायम राखत ८३.२२ टक्के निकालाची नोंद केली आहे.यंदा प्रथमच राबविण्यात आलेल्या कॉपीमुक्त अभियानात हे यश विद्यालयाने संपादन केले असून ९४.६० टक्के गुण मिळवून आदित्य मनेश कुरूंद शाळेत प्रथम आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या परीक्षेत शाळेतून एकूण १६१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीतही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.या परीक्षेत आदित्य मनेश कुरूंद याने ९४.६० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच अथर्व श्रीनिवास डहाळे (९१.२० टक्के) द्वितीय, करण तुकाराम कराळे (८९ टक्के) तृतीय, ऋषिकेश अनिल भाकरे (८८.२० टक्के) चतुर्थ तर निरज संतोष चारंडे याने ८७.८० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक प्राप्त केला.

# निराधारांना आता घरबसल्या डिजिटल हयात प्रमाणपत्र; हेळसांड थांबणार

**पूनम नवले | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : निराधार, वृद्ध, अपंग आणि विधवा लाभार्थ्यांना दरवर्षी हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी होणारी धावपळ आणि हेळसांड आता थांबणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आधार आधारित डिजिटल हयात प्रमाणपत्राला मान्यता दिली असून, लाभार्थ्यांना आता 'बेनिफिशियरी सत्यापन प'द्वारे घरबसल्या हयातीचा दाखला मिळणार आहे.

राज्य सरकारच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, विधवा व अपंग निवृत्तीवेतन योजनांतील लाभार्थ्यांना या निर्णयाचा मोठा लाभ होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात अशा योजनांचे तब्बल १ लाख ९७ हजार १३५ लाभार्थी असून राज्यभरात ही संख्या सुमारे ५० लाख आहे. या लाभार्थ्यांना दरवर्षी १




एप्रिल ते ३० जूनदरम्यान हयातीचा दाखला सादर करावा लागतो. मात्र अनेक वृद्ध, अपंग व निराधार नागरिकांना त्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत होते.

वेळ आणि पैशाचा खर्चही होत होता. ही अडचण लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने २०२३ मध्ये राज्य सरकारकडे डिजिटल प्रणालीचा प्रस्ताव पाठविला होता. अखेर राज्य सरकारने ७ मे २०२६ रोजी 'बेनिफिशियरी सत्यापन प'द्वारे डिजिटल हयात प्रमाणपत्र ग्राह्य धरण्याचा आदेश जारी केला. या प्रणालीद्वारे लाभार्थी मोबाईलवर प डाऊनलोड करून आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक नोंदवू शकतात.

त्यानंतर फेस आयडेंटिफिकेशन किंवा बायोमेट्रिकद्वारे पडताळणी करून डिजिटल हयात प्रमाणपत्र डाऊनलोड करता येणार आहे. सेतू केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आणि ग्रामपंचायत स्तरावरील संग्राम केंद्रांवरही ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तीन वर्षांच्या पाठपुराव्यामुळे लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## बितन गडावर महाराणा प्रताप जयंती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**झरेकाठी** : अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्याच्या सीमेवरील बितन गडावर कळसूबाई मित्र मंडळाच्या वतीने वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. गेल्या तीन दशकांपासून मंडळाचे गिर्यारोहक महाराष्ट्रातील विविध गडकिल्ल्यांवर धार्मिक व ऐतिहासिक उपक्रम राबवत असून गडकिल्ल्यांचा इतिहास जतन करण्याचे कार्य करत आहेत. कार्यक्रमाची सुरुवात महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी राणा की जय हो, शिवा की जय हो अशा जयघोषांनी परिसर दणाणून गेला. तसेच स्वराज्य रक्षणासाठी छत्रपती संभाजी महाराजांना मदत करणारे दुर्गादास राठोड यांचेही स्मरण करून अभिवादन करण्यात आले. महाराणा प्रताप हे त्याग, स्वाभिमान, पराक्रम व स्वातंत्र्याचे प्रतीक असल्याचे वक्त्यांनी सांगितले. गडकिल्ल्यांचा इतिहास, स्थापत्यकला, प्रशासन, युद्धनीती तसेच महान राजांच्या शौर्यगाथांची जनजागृती करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या उपक्रमात मंडळाचे अध्यक्ष भगीरथ मराडे, अभिजीत कुलकर्णी, संजय शर्मा, डॉ. महेंद्र आडोळे, निलेश पवार, प्रवीण भटाटे, नगमा खलीफा, रेखा भटाटे, मृणाली सातपुते यांच्यासह अनेक सदस्य सहभागी झाले होते.

# पोहेगावात महाराजस्व अभियानाला नागरीकांचा उत्स्फूर्त



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांच्या शासकीय अडचणी दूर करण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी सातत्याने पुढाकार घेतला असून त्यांच्या प्रयत्नातून महाराजस्व अभियानाला गती मिळाली आहे.

या अभियानामुळे विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय दूर झाली असल्याचे मत कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे यांनी व्यक्त केले. पोहेगाव येथे आयोजित महाराजस्व अभियान समाधान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार सौ. प्रफुल्लिता सातपुते होत्या. कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. आ. आशुतोष काळे यांच्या पुढाकारातून यापूर्वी कोकमठाण, पुणतांबा, सुरेगाव, रवंदे, दहेगाव बोलका आदी मंडळांमध्ये अशी शिबिरे घेण्यात आली होती. त्या ठिकाणी नागरिकांना विविध दाखले व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

त्यानंतर सोमवार (दि.११) रोजी पोहेगाव येथील वक्रतुंड मंगल कार्यालयात हे शिबिर पार पडले. या शिबिरात विद्यार्थ्यांना उत्पन्न, रहिवासी, जातीचे दाखले तसेच नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. दहावी-बारावी निकालानंतर प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांसाठी होणारी धावपळ यामुळे टळली. विद्यार्थ्यांसह पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. तसेच संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र काढणे व ऑनलाईन प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

इतर नागरिकांच्या विविध प्रलंबित समस्यांचेही निवारण करण्यात आले. यावेळी राहुल रोहमारे, शंकरराव चव्हाण, वसंतराव आभाळे, देवेन रोहमारे, बाबुराव थोरात, गजानन मते, गोपीनाथ रहाणे यांच्यासह शासकीय अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोंडेगावच्या वेडूआई मंदिराच्या जिर्णोद्धाराचा भव्य शुभारंभ

### महंत रामगिरी महाराज व महंत रमेशगिरी महाराज यांच्या शुभहस्ते भूमिपूजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गोंडेगाव** : तालुक्यातील गोंडेगाव येथील प्राचीन वेडूआई देवी मंदिराच्या जिर्णोद्धार शुभकार्याचा दिमाखात शुभारंभ पार पडला असून सरला बेटाचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज तसेच राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे महंत रमेशगिरी महाराज यांच्या हस्ते भूमिपूजन करून करण्यात आला.



यावप्रसंगी,ज्येष्ठ नागरिक सुधाकर नाना ठोंबरे पाटील यांच्या उपस्थित होते.अनेक वर्षांपासून प्रतिक्षेत असणाऱ्या मंदिर जिर्णोद्धाराच्या कामाला अखेर प्रारंभ झाल्यामुळे ग्रामस्थ व भाविकांमध्ये उत्साहपूर्ण वातावरण आहेत.हे पुरातन काळातील मंदिर आहेत.गेल्या काही वर्षांपासून जिर्णावस्थेत पडलेले होते.मंदिराच्या जिर्णो द्धाराबाबत यात्रेच्या बैठकींमध्ये सातत्याने चर्चा व्हायची अखेर मदिराचे कामाला शुभारंभ मंहताच्या शुभहस्ते करण्यात आले.

गेल्या सात-आठ वर्षांपासून देवीचा यात्रा उत्सव व नवरात्रोत्सव एकत्रितपणे साजरा करण्याचा निर्णय गावातील एकात्मतेचे प्रतिक ठरला.यावर्षी यात्रा उत्सव उत्साहात पार पडल्यानंतर यात्रा हिशोब बैठकीत मंदिर जिर्णो द्धार बांधकाम समितीची विशेष स्थापना करण्यात आली.

आजवर राजकीय मतभेदांने गावखेड्यामध्ये सामाजिक सलोखा बिघडताना दिसत असतानाच गोंडेगावाने एकोप्याचा आदर्श निर्माण केला. यामुळे वारसा जपण्यासाठी गाव एकत्र येणं आवश्यक असल्याचं एक संदेश या उपक्रमातून समाजसमोर देण्यात आला.या कार्यक्रमाला विजयानंदगिरी महाराज यांच्यासह गोंडेगाव पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिलेगावात मातीचा डंपर भरधाव वेगात घरात घुसला महिला गंभीर जखमी !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : तालुक्यातील शिलेगाव येथे मातीने भरलेला भरधाव डंपर थेट घरात घुसल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात घरातील महिला गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची मिळालेली माहिती अशी की, केंदळ रस्त्याने शिलेगावच्या दिशेने जाणारा मातीने भरलेला डंपर चालकाचे नियंत्रण सुटल्याने थेट सुभाष बबन म्हसे यांच्या घरात घुसला. डंपरने घराच्या तीन भिंती पाडत स्वयंपाकघरात प्रवेश केला. त्यावेळी स्वयंपाकघरात असलेल्या रोहिणी सचिन म्हसे या गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. घटना घडल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तात्काळ धाव घेत जखमी रोहिणी म्हसे यांना ढिगाऱ्यातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे शिलेगाव परिसरात एकच खळबळ उडाली त्या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून भरधाव अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. काल उशिरापर्यंत राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू हाते.

# एक मदतीचा हात श्रद्धाला देऊ शकतो नवजीवन

### दानशूरांनी पुढे येण्याचे कुटुंबाचे भावनिक आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : आयुष्याची सुंदर स्वप्ने डोळ्यांत साठवून जगणाऱ्या २० वर्षीय श्रद्धा हरकल हिच्यावर आज जीवघेणी वेळ आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील अत्यंत गरीब कुटुंबातील श्रद्धाची दोन्ही किडनी निकामी झाल्याने तिच्यावर तातडीने किडनी ट्रान्सप्लांट करण्याची वेळ आली आहे. आपल्या लेकराचा जीव वाचवण्यासाठी आईने स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठीची वैद्यकीय आणि शासकीय प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

मात्र आता लाखो रुपयांच्या ऑपरेशन खर्चापुढे हे कुटुंब हतबल झाले आहे. श्रद्धाचा भाऊ शंतनू हरकल याने समाजातील दानशूर व्यक्तींना भावनिक आवाहन करत बहिणीचा जीव वाचवण्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याची विनंती केली आहे. आम्ही आतापर्यंत उपचार, डायलिसिस, औषधे आणि तपासण्यांसाठी आयुष्यभराची जमा पूंजी खर्च केली. आता ट्रान्सप्लांट आणि पुढील उपचारांचा खर्च पेलण्याची ताकद उरलेली नाही, असे त्याने सांगितले. आई आपल्या लेकरासाठी स्वतःची किडनी दान करण्यास तयार आहे, पण आर्थिक अडचणींमुळे हे ऑपरेशन अडकल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. श्रद्धाच्या उपचारासाठी शासनासोबतच समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे येण्याची गरज निर्माण झाली आहे.

**मदतीसाठी बँक तपशील**
Bank Name : Bank of Maharashtra
Account No. : 60199798388
IFSC Code : M-HB0000029
Account Holder Name : Shantanu Avinash Harkal
UPI ID : shantanuharkal9oksbi

UPI ID: shantanuharkal9@oksbi

श्रद्धाला नवजीवन देण्यासाठी इच्छुकांनी आर्थिक मदत करण्याचे आवाहन कुटुंबीयांनी केले आहे. छोट्याशा मदतीतूनही एका तरुणीचे आयुष्य वाचू शकते, अशी भावनिक साद हरकल कुटुंबाने समाजाला घातली आहे.

# महात्मा गांधी शैक्षणिक संकुलाची उज्वल यशाची परंपरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : महात्मा गांधी शैक्षणिक संकुलातील कन्या विभागाचा एसएससी बोर्ड परीक्षेचा निकाल यंदा ९४.७३ टक्के लागला असून विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यालयाच्या उज्वल निकालामुळे शैक्षणिक संकुलाच्या गुणवत्तेची परंपरा पुन्हा अधोरेखित झाली आहे. या परीक्षेत संचिता अनिल मेटे हिने ९१.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच प्रांजल नितीन पंडित हिने ८८ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला असून हर्षदा राजेंद्र टाचतोडे हिने ८७.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विद्यार्थिनींच्या या यशामुळे पालक व परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब म्हस्के, उपाध्यक्ष अरुण कडू, प्राचार्य विनायक मेथवडे, मुख्याध्यापिका नलिनी जाधव तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

# तळेगावला स्थानिक गुन्हे शाखेचा जुगार अड्ड्यावर छापा

### ५ . ८६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील तळेगाव दिघे शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी (दि.९) धाडसी कारवाई करत आठ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले.

या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल व मोटारसायकली असा एकूण ५ लाख ८५ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर तालुका पोलीस ठाणे हद्दीत शनिवारी पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तळेगाव दिघे ते वडगाव पान रस्त्यावरील समर्थ पेट्रोल पंपासमोर लिंबाच्या झाडाखाली काही इसम विनापरवाना 'तिरट' नावाचा हारजितीचा जुगार खेळत आहेत.

माहिती मिळताच पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. या कारवाईत शशिकांत काशिनाथ जगताप (रा. तळेगाव दिघे), पंढरीनाथ काशिनाथ भेंडाळे ता. (रा. कहांडळवाडी, सिन्नर), विलास रघुनाथ दिघे, काशिनाथ जगन्नाथ जगताप, सचिन बबन दिघे, अण्णासाहेब बाळू जगताप, सुनील नवनाथ दिघे (सर्व रा. तळेगाव दिघे, ता. संगमनेर) तसेच सुरेश भाऊसाहेब कांडेकर (रा. डोंगेवाडी, ता. कोपरगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून ७ हजार ५१० रुपयांची रोख रक्कम, १ लाख ५ हजार रुपये किमतीचे आठ मोबाइल फोन तसेच ४ लाख ७३ हजार ३२० रुपये किमतीच्या सात मोटारसायकली असा एकूण ५ लाख ८५ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गु.र.नं. २५२/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

या कारवाईमुळे अवैध धंदे चालकांत एकच खळबळ उडाली आहे.

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी श्री/श्रीमती. हनिफाबी अमिर हमजा शाह रा. देवळालीप्रवरा, ता. राहूरी, जि. अहिल्यानगर यांचे कडील दिनांक ०९/१०/२०२५ रोजी चा अर्ज प्राप्त झालेला आहे सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमूद केले आहे की अर्जदार यांची आई नामे नियमतबी जमादार सय्यद या दिनांक २२/११/१९५८ रोजी मौजी वडाळा महादेव तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथे राहते घरी प्रसूत होऊन अर्जदार नामी हनिफाबी यास जन्म दिला आहे. सदर अर्जदार यांची जन्माची नोंद त्यांना जन्म मृत्यू कार्यालयात मिळून आलेली नाही त्यामुळे त्यांनी सदर जन्माची नोंद सरकारी दप्तरी लावण्यासाठी दिनांक ०१/१०/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र करून दिले आहे.

उपरोक्त या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेला सूचित करण्यात येते की वरील जन्माचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यकता कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून पंधरा दिवसांची आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित जन्माचा दाखला निर्गमित करण्यात येईल.

**स्वाक्षरी**
**तहसीलदार श्रीरामपूर करिता**

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी श्री/श्रीमती. शकीला चाँद शेख रा. श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर यांचे कडील दिनांक ०९/१०/२०२५ रोजी चा अर्ज प्राप्त झालेला आहे सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमूद केले आहे की अर्जदार यांची आई नामे नियमतबी जमादार सय्यद या दिनांक १०/०६/१९७१ रोजी मौजी वडाळा महादेव तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथे राहते घरी प्रसूत होऊन अर्जदार नामी शकीला यास जन्म दिला आहे. सदर अर्जदार यांची जन्माची नोंद त्यांना जन्म मृत्यू कार्यालयात मिळून आलेली नाही त्यामुळे त्यांनी सदर जन्माची नोंद सरकारी दप्तरी लावण्यासाठी दिनांक ०१/१०/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र करून दिले आहे.

उपरोक्त या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेला सूचित करण्यात येते की वरील जन्माचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यकता कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून पंधरा दिवसांची आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित जन्माचा दाखला निर्गमित करण्यात येईल.

**स्वाक्षरी**
**तहसीलदार श्रीरामपूर करिता**

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी श्री/श्रीमती. तस्लीम गणी शाह रा. भालगाव, ता. गंगापूर, जि. संभाजीनगर यांचे कडील दिनांक ०९/१०/२०२५ रोजी चा अर्ज प्राप्त झालेला आहे सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमूद केले आहे की अर्जदार यांची आई नामे नियमतबी जमादार सय्यद या दिनांक १२/०६/१९७५ रोजी मौजी वडाळा महादेव तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथे राहते घरी प्रसूत होऊन अर्जदार नामी तस्लीम हीस जन्म दिला आहे. सदर अर्जदार यांची जन्माची नोंद त्यांना जन्म मृत्यू कार्यालयात मिळून आलेली नाही त्यामुळे त्यांनी सदर जन्माची नोंद सरकारी दप्तरी लावण्यासाठी दिनांक ०१/१०/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र करून दिले आहे

उपरोक्त या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेला सूचित करण्यात येते की वरील जन्माचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यकता कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून पंधरा दिवसांची आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित जन्माचा दाखला निर्गमित करण्यात येईल.

**स्वाक्षरी**
**तहसीलदार श्रीरामपूर करिता**

## पान १ वरुन

### न्यायालयाच्या निर्बंधामुळे ग्राम पंचायतींचा आर्थिक कारभार ठप्प!

बंधने घातली आहेत. सरपंचांना प्रशासक म्हणून नेमण्यासाठी कायद्यात बदल करून राज्यपालांचा अध्यादेश आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. अखिल भारतीय सरपंच परिषदेने ग्रामविकास विभागाच्या भूमिकेवरही नाराजी व्यक्त केली आहे. वर्धा जिल्ह्यातील ३२५ माजी सरपंच न्यायालयातून आदेश घेऊन आले असतानाही प्रशासन त्याची अंमलबजावणी करत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, परिषदेकडून प्रशासकपदी सरपंच कायम ठेवून आर्थिक अधिकार गटविकास अधिकाऱ्यांकडे देणे, शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करणे किंवा राज्यपालांचा अध्यादेश काढून सरपंचांना पूर्ण अधिकार देणे, अशा विविध मागण्या शासनाकडे करण्यात आल्या आहेत.

### मायलेकाचे मृतदेह आढळले

सय्यद यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह विहिरीबाहेर काढून जामखेड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले,तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

पोलीस तपास आणि संशयाचे धुमारे:- ही घटना नेमकी कशी घडली, याबाबत अद्याप स्पष्टता मिळालेली नाही.प्राथमिक अंदाजानुसार,मृत्यूची वेळ १० मे च्या मध्यरात्री १ ते ३ वाजेच्या दरम्यान असावी,असे नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी खर्डा पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.ही घटना निव्वळ आत्महत्या की यामागे काही घातपात आहे? मायलेक वंजारवाडीतून तरडगाव येथील विहिरीपर्यंत कसे पोहोचले?या प्रकरणी तालुक्यातील नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.सध्या या प्रकरणाचा तपास सहाय्यक फौजदार सय्यद करत असून, खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि चौकशी सुरू आहे. पोस्टमार्टमच्या अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल,अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

### 'ट्रॅव्हल्स जिहाद' विरोधात हिंदूंचा कायनेटिक चौकात रास्तारोको

अहिल्यानगर जिल्ह्यात सर्रासपणे सुरुवातीला छेडछाड करणे, त्यानंतर नंबर मिळवणे आणि नंतर दबाव आणणे ,व्हिडिओ, फोन व्हायरल करण्याची धमकी देणे असे प्रकार चालू आहेत. हे प्रकार वेळीच थांबले पाहिजेत. अन्यथा जशास तसे उत्तर दिले जाईल . असा इशारा यावेळी आमदार जगताप यांनी दिला. यापुढे महिला तरुणींनी जागृत राहणे गरजेचे आहे. यावेळी काही आक्षेपार्य गोष्टी त्यांच्या लक्षात येतील. त्याचवेळी तात्काळ विरोध करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. हिंदू समाजाने एकजूट दाखवली पाहिजे नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगाल निवडणुकीत सर्व हिंदू समाज एकवटल्याने बांगलादेशी जी हाद्यांचे काहीही चालले नाही अशी एकजूट आता अंतर्गत मतभेद विसरून महाराष्ट्रात आपल्या शहरात दाखवा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या आंदोलनाच्या वेळी महापौर ज्योती गाडे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक सुरेश बनसोडे यासह राष्ट्रवादी भाजपा युतीचे नगरसेवक हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जय भवानी जय श्रीराम भारत माता की जय हिंद की बात करेगा वही देश पर राज करेगा अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या या आंदोलनाच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा नगर पुणे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

# पिंपळवाडी नदीपात्रात अवैध वाळू उपशावर कारवाई,

## दोन जेसीबी व दोन मिनी हायवा जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील मोजे पिंपळवाडी येथे नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उत्खननावर महसूल विभागाने मोठी कारवाई करत दोन जेसीबी आणि दोन मिनी डंपर जप्त करून तीन वाहने तहसील आवारात जमा लावून एक जेसीबी पोलिस पाटलांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तहसीलदार नवनाथ वगवाड आणि प्रशिक्षणार्थी तहसीलदार सागर वाघमारे यांना

> **अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध ही मोहीम यापुढेही अधिक तीव्र करण्यात येईल. पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या माफियांची गय केली जाणार नाही.**
>
> **नवनाथ वगवाड,**
> **तहसीलदार गंगापूर,**

११ मे रोजी पिंपळवाडी शिवारात नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन होत असल्याची माहिती मिळाली असता तहसीलदार यांनी तत्काळ पथकास पाचारण केले असता या ठिकाणी दोन जेसीबी तसेच दोन मिनी हायवा आढळून आले सदर पथकाने परवानगी बाबत विचारणा केली असता कोणतीही वाळू उत्खननाची परवानगी




नसल्याची खात्री झाल्याने वाळुने भरलेल्या दोन मिनी हायवा व दोन जेसीबी ताब्यात घेऊन पंचनामा केला मार्गदर्शनाखाली सोमवारी, ११ मे २०२६ रोजी ही धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये दोन जेसीबी आणि दोन डंपर जप्त करण्यात आले आहेत. महसूल पथकाचा छापा पिंपळवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळताच महसूल विभागाच्या पथकाने नदीपात्रात छापा टाकला. या मंडळ अधिकारी मनिषा कोतकर, ग्राम महसूल अधिकारी राजेश खराडकर,गीता सरग, महसूल अधिकारी ब्रिजेश पारवे, जमादार मनोज घोडके,नारायण शिंदे,पोलीस पाटील यांनी ही कारवाई केली आहे..या कारवाईमुळे गंगापूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## निधन वार्ता

### कलाबाई भालेराव



**वडाळा** महादेव : येथील गं.भा. कलाबाई गहिनाजी भालेराव (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्च्यात मुले ४ मुलगी १ सुना नातंवडे जावई असा मोठा परिवार आहे. वडाळा महादेव येथील ग्रामपंचायत उपसरपंच म्हणून त्यांनी कामकाज हाताळले आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते आण्णासाहेब भालेराव रावसाहेब भालेराव काशिनाथ भालेराव छाया लहानु जाधव, सुकदेव गहिनाजी भालेराव यांच्या त्या मातोश्री होत.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME AVANTI RAHUL BARAHATE ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS AVANTI RAHUL BARHATE (AADHAR NO. 3857 4734 6529) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 11/05/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME JAYSHREE SAMPATRAO PADEKAR ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS JAYASHRI RAHUL BARHATE (AADHAR NO. 3681 2912 7467) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 11/05/2026

# केशर मल्टीस्टेटला बिपीन कोल्हे यांच्याकडून कौतुकाची थाप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शैक्षणिक, सहकार, उद्योग तसेच साखर कारखानदारी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत देशभरात 'कोल्हे पॅटर्न'ची ओळख निर्माण करणारे संजीवनी उद्योग समूहाचे सर्वेसर्वा बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी नुकतीच केशर उद्योग समूहाला सदिच्छा भेट दिली.

स्वर्गीय माजी मंत्री शंकरराव कोल्हे यांच्या दूरदृष्टीतून उभ्या राहिलेल्या संजीवनी उद्योग समूहाच्या कार्याचा वारसा पुढे नेत असलेल्या बिपीनदादा कोल्हे यांनी जिल्ह्यात अग्रेसर असलेल्या केशर उद्योग समूह तसेच केशर मल्टीस्टेटच्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.

यावेळी केशर मल्टीस्टेटचे चेअरमन तथा युवा नगरसेवक सागरदादा तनपुरे यांनी बिपीनदादा कोल्हे यांचा सत्कार केला. केशर उद्योग समूह व केशर मल्टीस्टेटच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या सामाजिक, आर्थिक व विकासाभिमुख उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त करत बिपीनदादा कोल्हे यांनी संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी बाळासाहेब गाडे, ॲड. जालिंदर ताकटे, सचिन वराळे, गणेश गाडे, सुजय काळे, गोरखनाथ घोरपडे, एकनाथ बर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.



# ट्रॅव्हल्स जिहाद विरोधात हिंदू समाजाचा कायनेटिक चौकात रास्ता रोको

**अहिल्यानगर :** नगर मध्ये लव, लँड आणि व्होट जिहाद पाठोपाठ आता ट्रॅव्हल्स जिहाद प्रकार वाढले आहेत. त्यामुळे महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. या विरोधात सर्व हिंदू महिला नागरिकांनी जागरूक होणे गरजेचे आहे. आता हे सहन न करता जशास तसे उत्तर देण्याची वेळ आली आहे. असा स्पष्ट इशारा आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी दिला.

नगर पुणे शिवशाही बस मध्ये मुस्लिम कंडक्टरने एका हिंदू महिलेची छेड काढण्याचा सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल झाल्याने आमदार संग्राम जगताप हे चांगलेच आक्रमक झाले. लव जिहाद, लँड जिहाद, आणि आता नव्या ट्रॅव्हल जिहाद विरोधात सकल हिंदू समाजाच्या वतीने आज सकाळी कायनेटिक चौकात सुमारे एक तास रास्ता रोको आंदोलन केले. रणरणत्या उन्हात तापलेल्या रस्त्यावर शेकडो हिंदू महिलांसह नागरिकांनी उस्फुर्तपणे रस्ता रोको आंदोलनात सहभाग घेतला. हिंदू प्रवासी महिलेची छेड काढणाऱ्या मुस्लिम कंडक्टरवर जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही व त्याची प्रत आम्हाला प्राप्त होत नाही. तोपर्यंत रस्त्यावरून उठणार नाही व आंदोलन मागे घेणार नाही. असा आक्रमक पवित्रा आमदार संग्राम जगताप यांनी घेतल्यावर पोलीस प्रशासनाची चांगली धावपळ उडाली. सुमारे एक तासानंतर पोलिसांनी संबंधित कंडक्टरवर गुन्हा दाखल केला व त्याची प्रत आमदार जगताप संग्राम जगताप यांना दिल्यानंतर हे रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले नगरमध्ये लव जिहाद, लँड जिहाद आणि आता व्होट जिहाद आणि आता ट्रॅव्हल जिहाद .यापूर्वीही वेळोवेळी हिंदू समाजाने वेगवेगळ्या जिहाद विरोधात आंदोलने केली . परंतु आता जिहाद प्रवृत्तीच्या लोकांनी ट्रॅव्हल जिहाद हा प्रकार सुरू केला आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या शिवशाही या बसमध्ये महिलांची छेडछाड करणे, अश्लील वर्तन करणे याचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त झाले आहे. हे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. सुरुवातीला छेडछाड करणे, त्यानंतर नंबर मिळवणे आणि नंतर दबाव आणणे ,व्हिडिओ, फोन व्हायरल करण्याची धमकी देणे असे प्रकार चालू आहेत. हे प्रकार वेळीच थांबले पाहिजेत. अन्यथा जशास तसे उत्तर दिले जाईल . असा इशारा यावेळी आमदार जगताप यांनी दिला. यापुढे महिला तरुणींनी जागृत राहणे गरजेचे आहे. यावेळी काही आक्षेपार्य गोष्टी त्यांच्या लक्षात येतील. त्याचवेळी तात्काळ विरोध करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. हिंदू समाजाने एकजूट दाखवली पाहिजे नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगाल निवडणुकीत सर्व हिंदू समाज एकवटल्याने बांगलादेशी जीहाद्यांचे काहीही चालले नाही अशी एकजूट आता अंतर्गत मतभेद विसरून महाराष्ट्रात आपल्या शहरात दाखवा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले या आंदोलनाच्या वेळी महापौर ज्योती गाडे भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते नगरसेवक सुरेश बनसोडे यासह राष्ट्रवादी भाजपा युतीचे नगरसेवक हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी जय भवानी जय श्रीराम भारत माता की जय हिंद की बात करेगा वही देश पर राज करेगा अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या या आंदोलनाच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा नगर पुणे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने मोठा पोलीस बंदोबस्त साईनाथ केला होता.

# पालकमंत्र्यांच्या इशाऱ्यानंतर आश्वी पोलीस ॲक्शन मोडवर

## रात्रभर नाकाबंदी ; संशयित वाहनांची धरपकड



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोऱ्यांच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढत्या गुन्हेगारीची गंभीर दखल घेत राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पोलिसांना कडक निर्देश दिल्यानंतर आश्वी पोलीस यंत्रणा तत्काळ ॲक्शन मोडमध्ये आली. शनिवारी रात्री आश्वी खुर्द व आश्वी बुद्रुक परिसरात जोरदार नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली.

शनिवारी सायंकाळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आश्वी खुर्द आणि आश्वी बुद्रुक या गावांना भेट देत स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी नागरिकांनी परिसरातील चोरीच्या वाढत्या घटनांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. घरफोड्या, शेतमाल चोरी आणि रात्रीच्या हालचालींमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले असून पोलिसांचा धाक कमी झाला आहे का, असा सवालही नागरिकांनी उपस्थित केला. यावर पालकमंत्र्यांनी तातडीने दखल घेत आश्वी पोलिसांना गुन्हेगारांचा कडक बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दांत त्यांनी पोलिसांना तंबी दिली. पालकमंत्र्यांच्या सूचनेनंतर शनिवारी रात्रीपासूनच आश्वी पोलिसांनी कारवाईला वेग दिला. आश्वी खुर्द व आश्वी बुद्रुक गावांना जोडणारे मुख्य मार्ग, चौक तसेच संवेदनशील भागांमध्ये नाकाबंदी करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक दुचाकी व चारचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली. संशयित व्यक्तींची ओळख पडताळून चौकशी करण्यात आली.

पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून चोरीच्या घटनांना आळा बसेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. अशाच प्रकारे सातत्याने रात्री गस्त, नाकाबंदी आणि संशयितांवर कारवाई झाली, तर परिसर सुरक्षित होईल, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. आश्वी पोलिसांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेचे परिसरात स्वागत होत असून पोलिसांच्या या मोहिमेमुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी काळातही अशीच कडक कारवाई सुरू राहावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## निवडणुका लांबल्याने पुणतांबा परिसरातील संभाव्य उमेदवारांचा हिरमोड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** :अहिल्यानगर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा कार्यक्रम अद्याप जाहीर न झाल्याने पुणतांबा परिसरातील संभाव्य उमेदवारांचा हिरमोड झाला आहे. निवडणुका कधी लागणार याबाबत अनिश्चितता असल्याने इच्छुकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, तरीही अनेकांनी पडद्यामागून मोर्चेबांधणी सुरू केली आहे. जिल्हा परिषद पुणतांबा गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव असून पंचायत समिती गण सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी असल्याने इच्छुकांनी गाठीभेटी सुरू केल्या आहेत. काहींनी समाजमाध्यमांच्या माध्यमातून आपली अप्रत्यक्ष उमेदवारी जाहीर करण्यास सुरुवात केल्याची चर्चा आहे. पुणतांब्यासह ११ गावे राहाता तालुक्यात असली तरी ही गावे कोपरगाव विधानसभा मतदारसंघात येतात. या भागात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे यांचे वर्चस्व मानले जाते. मात्र, गणेश कारखान्याची निवडणूक, पुणतांबा, वाकडी व चितळी ग्रामपंचायतींतील सत्तांतर तसेच विवेक कोल्हे आमदार झाल्यानंतर कोल्हे गटाची ताकद वाढल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत कोल्हे गट पूर्ण ताकदीने मैदानात उतरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दुसरीकडे आ. आशुतोष काळे स्वतंत्र पॅनेल उभे करणार की स्थानिक कार्यकर्त्यांवर निर्णय सोपविणार, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. काही महिन्यांपूर्वी पुणतांबा येथे झालेल्या विकासकामांच्या उद्घाटन सोहळ्यात मोठ्या प्रमाणात सर्वपक्षीय उपस्थिती होती. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका बिनविरोध होतील का, अशीही चर्चा रंगली आहे.दरम्यान, स्थानिक पातळीवर काही नेत्यांच्या पक्षांतराच्या चर्चांनाही उधाण आले आहे.

# जयहिंदच्या शिबिरातून घडतेय विज्ञाननिष्ठ पिढी : डॉ. सुधीर तांबे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : निरोगी व सुदृढ समाजनिर्मितीसाठी कार्यरत असलेल्या 'जयहिंद लोकचळवळ'च्या वतीने अमृतवाहिनी मॉडेल स्कूल येथे आयोजित पाचदिवसीय निवासी युवा सर्वांगीण विकास शिबिर उत्साहात पार पडले. ११ ते १६ वयोगटातील १०० विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभाग घेत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून प्रशिक्षण घेतले.

शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना संस्थेचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले, या उपक्रमातून विज्ञाननिष्ठ विचारांची सुदृढ पिढी घडेल. देशाचा विकास साधायचा असेल तर युवकांचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. समाजातील आर्थिक विषमता कमी झाली तरच देश खऱ्या अर्थाने प्रगत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

शिबिरात विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. सकाळच्या सत्रात योगा, एरोबिक्स व व्यायामाचे प्रकार घेण्यात आले. सायंकाळी मैदानी खेळ, पथनाट्य,



नाटक, अभिनय, नृत्य, गीतगायन व झांज यांसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण रंगले.

बौद्धिक सत्रात प्रा. बाबा खरात यांनी पर्यावरण संवर्धन, शिवाजी नाईकवाडी यांनी मानवी मूल्ये, तर हिरालाल पगडाल यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांवरील समज-गैरसमज यावर मार्गदर्शन केले. स्वप्निल मानव यांनी आजचा युवक या विषयावर संवाद साधला. प्राचार्य आशिष कुमार यांनी करिअर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मातीकाम, पेंटिंग, कागदकाम, ओरिगामी व हॉर्स रायडिंगचे उपक्रम घेण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अनंत शिंदे, बजरंग जेडगुले व हर्षल थेटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

वैभवी प्रेमलता संजय आढाव, प्रा. कोमल मस्के, धनश्री टाकळकर, दिपाली गायके, समाधान जाधव, तेजस पवार यांच्यासह अनेक प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समारोपावेळी विद्यार्थ्यांनी शिबिराचा कालावधी वाढविण्याची मागणी केली. त्यावर डॉ. तांबे यांनी पुन्हा शिबिर घेण्याचे आश्वासन दिले. तसेच गावागावात वाचन चळवळ सुरू करण्याचे आवाहनही केले. यावेळी पालक, विद्यार्थी, राजेंद्र जोरावर व विलास दिघे उपस्थित होते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि .१२ मे २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२५ २६० ४०० | ८-१ | १३७ ३८० ३३५ | जोड ८०-४१-२५-९७-१६

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१३६ ३७० ३३४ | ०-२ | १५६ २४६ ६६० | जोड ०६-४२-१८-३५-२९

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

३९० ४८० २२९ | २-८ | १७० ३५० ८०० | जोड २१-३८-६४-७९-८०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to [redacted] | 56[redacted] 06 15[redacted] | 14[redacted] 43 67[redacted] | 23[redacted] 45 50[redacted] | 13[redacted] 77 89[redacted] | 26[redacted] 85 14[redacted] |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |

# बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर कारवाईला हिरवा कंदील


## उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार चार महिने राज्यात विशेष मोहीम

किरण बोरुडे । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : शासकीय सेवेत बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी मिळवणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात मुंबई उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली असून, सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांची सक्तीची पुनर्पडताळणी करण्यास हिरवा कंदील दिला आहे. पुनर्तपासणीत दिव्यांग आढळणार नाहीत अशा कर्मचाऱ्यांना सक्तीने निवृत्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.**

या निर्णयामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह विशेषतः श्रीगोंदा तालुक्यात चर्चेत असलेल्या बोगस दिव्यांग कर्मचारी प्रकरणांवर पुन्हा प्रकाशझोत पडला आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील चार महिने राज्यात विशेष मोहीम राबविण्याचे सरकारने ठरवले आहे.

दिव्यांग कल्याण विभागाचे तत्कालीन सचिव तुकाराम मुंढे यांनी ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्व शासकीय दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची व शारीरिक तपासणी करण्याचा




आदेश दिला होता. या आदेशाविरोधात अनेक कर्मचाऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र न्यायमूर्ती रवींद्र घुगे व अभय मंत्री यांच्या खंडपीठाने ६ मे रोजी दिलेल्या निकालात पुनर्पडताळणी मोहिमेला मान्यता देत १२० दिवसांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयासमोर सादर झालेल्या अहवालानुसार, जिल्हा परिषदांमधील ७ हजार ५३५ कर्मचाऱ्यांची पुनर्तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३७५ कर्मचारी दिव्यांग लाभासाठी अपात्र आढळले आहेत. त्यामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणावर बोगस प्रमाणपत्रांचा वापर झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, तपासणी टाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना २१ दिवसांची अंतिम मुदत देऊन त्यानंतर थेट निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निलंबन काळात केवळ ५० टक्के वेतन देण्यात येणार असून, तरीही सहकार्य न केल्यास निवृत्तिवेतनात कपात करण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, बनावट प्रमाणपत्रे देणाऱ्या डॉक्टरांवरही एफआयआर व शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यातील बोगस दिव्यांग घोटाळ्यांवर मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

---

# दखल

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत दहिगावशे ग्रामपंचायतीची पाहणी



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव शे येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या तपासणी समितीने ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची पाहणी केली. गावातील सर्वांगीण विकास, शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच प्रशासकीय कामकाजाचा दर्जा पाहून समितीने समाधान व्यक्त केले. समितीने ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात आलेल्या विविध योजनांची केवळ कागदोपत्रीच नव्हे, तर प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. यामध्ये सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जलजीवन मिशनची अंमलबजावणी, रस्ते विकासकामे, सौरऊर्जा प्रकल्प, सार्वजनिक वास्तूंची देखभाल, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी सेवा, शैक्षणिक सुविधा तसेच ग्रामस्थांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला. नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आलेल्या विकासकामांमुळे गावात सकारात्मक बदल घडून आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सरपंच रामेश्वर भापकर व ग्रामसेवक यांनी गावात राबविण्यात आलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती समितीसमोर मांडली. शासकीय निधीचा योग्य वापर, कामकाजातील पारदर्शकता आणि स्थानिक स्तरावरील प्रभावी नियोजनामुळे दहिगावशे हे गाव विकासाच्या मुख्य प्रवाहात आल्याचे त्यांनी सांगितले.

## ना. छगन भुजबळ यांची नेप्ती येथील नंदनवन जाधव फार्म हाऊसला सदिच्छा भेट



**अहिल्यानगर :** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री नामदार छगन भुजबळ यांनी नेप्ती येथील नंदनवन जाधव फार्म हाऊसला दिलेल्या सदिच्छा भेटीमुळे राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. या भेटीत शिवसेनेचे दत्ता जाधव यांच्याशी काही काळ बंद खोलीत झालेल्या चर्चेमुळे विविध राजकीय समीकरणांबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. नेप्ती परिसरातील नंदनवन जाधव फार्महाऊस येथे या भेटीत भुजबळ यांनी जाधव कुटुंबीयांशी आत्मीय संवाद साधत विचारपूस केली. यावेळी राजकीय चर्चांसोबतच कौटुंबिक स्नेहाचे दर्शनही या भेटीत घडले. या प्रसंगी जाधव परिवाराच्या वतीने ना. छगन भुजबळ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाबासाहेब जाधव, शिवसेनेचे दत्ता जाधव, माजी नगरसेविका सुवर्णाताई जाधव, नेप्ती गावचे सरपंच अंबादास पुंड, आदेश जाधव, हिरा सेठ जाधव, राज जाधव, हेमंत जाधव, हिमांशू जाधव, अश्विन जाधव, अभिजीत दळवी, बाळासाहेब कोल्हे, विकास सपाटे, ओंकार शेळके, अंजली जाधव, शुभम कोल्हे, शितल जाधव आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भेटीदरम्यान ना. छगन भुजबळ यांनी जाधव कुटुंबीयांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण समितीवर दत्ता गाडळकर



**अहिल्यानगर :** जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून नगरसेवक तथा जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पालकमंत्री तथा समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते गाडळकर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दिलीप भालसिंग, बाबासाहेब सानप आदी उपस्थित होते. जिल्हा रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक सक्षम, प्रभावी व रुग्णाभिमुख करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने संनियंत्रण व सल्लागार समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये विविध विभागांतील अधिकारी तसेच अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात आला असून, या नियुक्तीसाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे व आ. संग्राम जगताप यांनी विशेष आभार मानले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालयात औषध उपलब्धता, स्वच्छता, रुग्णसेवा, सुविधा आणि व्यवस्थापन या बाबींवर विशेष लक्ष देऊन रुग्णालय अधिक सक्षम करण्यासाठी समितीमार्फत काम केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पो. उ.नि. वारुळे व किर्तनकार गणगे यांना पुरस्कार

**अहिल्यानगर :** छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव



वाघा (ता. नगर) येथे रविवार, दि. १७ मे रोजी सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात आयोजित करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, समाजप्रबोधन आणि लोकपरंपरांचा जागर करणाऱ्या या संमेलनात राज्यभरातील नामवंत साहित्यिक, कवी, समाजप्रबोधक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत. या संमेलनात पोलीस दलात उल्लेखनीय कार्य करणारे नगर तालुका पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक गणेश वारुळे यांना 'उत्कृष्ट पोलीस अधिकारी पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. तसेच वारकरी परंपरेचा वारसा जपत किर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या युवा किर्तनकार दिपाली गणगे (कोकाटे) यांना 'संत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार' जाहीर करण्यात आला असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

---

# उगवत्या पिढीला घडविण्याचे व्यक्तिमत्व : लोहगावकर

## वाचनालयात आयोजित २८ बालकांच्या शिबिराचा समारोप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** इंटरनेट मोबाईलच्या मायाजाळात बुद्धी कुंठीत होत असताना उगवत्या पिढीला सुंदर मूर्तीमधे घडविण्याचे अहिल्यानगर जिल्हा वाचनालय व्यक्तिमत्व विकास शिबिराचे कार्य प्रेरक असल्याचे प्रतिपादन माय टिफिनचे संचालक उद्योजक हेमंत लोहगावकर यांनी केले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित २८ व्या बालकांच्या व्यक्तिमत्व विकास शिबिराच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित विद्यार्थी व पालकांशी सुसंवाद साधताना बोलत होते.

यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, शिबिराच्या संयोजिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख किरण आगरवाल. ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल,पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी जिल्हा वाचनालयाच्या वतीने चार मे पासून सुरू झालेल्या या शिबिरात प्रसिद्ध खडू शिल्पकार श्री अशोक डोळसे, माणुसकीची शाळा चे शिवाजीराव नाईकवाडी, रेघोट्याकार साधना कसपटे -महानोर, नलिनी भालेराव, शितल पांढरे ,प्रा. ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, सौ ज्योती वाळिंबे ,मयूर कांगुळे , कल्पेश शिंदे, प्रा. स्वाती अहिरे यांनी कला साहित्य, संस्कार, वाचन ,आरोग्य, खेळ यावर सहभागी विद्यार्थ्यांना झालेले मार्गदर्शन प्रेरणादायी ठरले असल्याचे सांगितले .

याप्रसंगी शिबिरामध्ये सहभागी झालेल्या बालकांच्या कलागुणांनी, लेखन साहित्याने सजलेल्या वृत्तपत्राचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कुमारी अद्या वाळिंबे, आरोही राहींज ,पालक मयूर कांगोळे, ज्योती वाळिंबे यांनी मनोगते व्यक्त केले.

मान्यवरांचा परिचय शिल्पा रसाळ ,सन्मान दिलीप पांढरे यांनी तर आभार किरण आगरवाल यांनी मानले .शिबिर यशस्वीतेसाठी जिल्हा वाचनालयातील कर्मचारी वर्षा जोशी ,संजय गाडेकर, आशिष तरोटे ,संकेत फाटक,आर्यन मडुर ,शेख सिकंदर यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले.

# सतलोक आश्रम जमीन व्यवहाराची नोंद नामंजूर

## अन्याय निवारण निर्मूलन सेवा समिती उपोषणावर ठाम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील लष्करी सरावासाठी आरक्षित क्षेत्रात सुरू असलेल्या कथित विनापरवाना शेड बांधकाम आणि आदिवासी जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारावरून मोठा वाद निर्माण झाला होता. या प्रकरणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभागांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीनंतर तहसीलदार कार्यालयाकडून संबंधित जमीन व्यवहाराची नोंद नामंजूर करण्यात आल्याचे लेखी पत्र देण्यात आले आहे. मात्र या प्रकरणात चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी संघटना उपोषणावर ठाम असून, लवकरच उपोषण करणार असल्याची माहिती समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिली.

या संदर्भात संघटनेच्यावतीने लेखी तक्रार करण्यात आली होती. ढवळपुरी परिसरातील अनेक गट लष्करी सरावासाठी आरक्षित आहेत. या भागात नियमितपणे मोठ्या प्रमाणावर सराव केला जातो. अशा परिस्थितीत गट क्रमांक ११२०/२ मधील जागेवर मुनिंदर धर्मार्थ ट्रस्ट, कुरुक्षेत्र (हरियाणा) यांच्या सतलोक आश्रमाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर शेड बांधकाम सुरू करण्यात आले आहे. हे बांधकाम आवश्यक परवानग्या न घेता करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला होता.

समितीने केलेल्या तक्रारीनुसार, संबंधित जमीन ही आदिवासी समाजाच्या मालकीची आणि सिलिंग कायद्यांतर्गत असलेली जमीन असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे ही जमीन विक्रीसाठी कशी उपलब्ध झाली, तसेच त्या व्यवहाराला कोणत्या नियमांच्या आधारे मंजुरी देण्यात आली, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती.

सतलोक आश्रमात विविध राज्यांतील हजारो भाविक आणि सेवादार कार्यक्रमांच्या निमित्ताने येत असतात. अनेक दिवस मुक्काम करणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते.

# माता ही प्रत्येकाच्या आयुष्यात प्रेरणास्थान : सपकाळ

**अहिल्यानगर :** हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने मातृत्व दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. तसेच राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत विजयी झालेले नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच श्रीमती अलकाताई शिवाजीराव कर्डिले यांच्यासह ग्रुपमधील महिलांचा मातृत्व दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थितांना रोप भेट देऊन अनोख्या पद्धतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचा संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ आणि सचिन चोपडा यांच्या हस्ते शाल, स्मृतीचिन्ह, स्मरणिका व रोप देऊन सत्कार करण्यात आला. मातृत्वाचा गौरव, कार्यकर्तृत्वाचा सन्मान आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीचा सुंदर संगम या कार्यक्रमातून पाहायला मिळाला. यावेळी प्रांजली सपकाळ, शोभाताई मुंढे, संगीता सपकाळ, सुरेखाताई आमले, प्रियंका कर्डिले, मीनाताई परदेशी, आरतीताई बोराडे, मनीषा गायकवाड, आशाताई पराते, वंदनाताई बोधले, जहीर सय्यद, गंगाराम मुंढे, सर्वेश सपकाळ, दिलीप ठोकळ, सचिन पेंढूरकर, अशोक पराते, ईवान सपकाळ, सुभाषराव पेंढूरकर, ताराचंद ठोकळ, इंजि. अनिल सोळसे, अविनाश जाधव, रतन मेहेत्रे, मुन्ना वाघस्कर, नवनाथ वेताळ, सुभाष पेंढुरकर, आनंद सदलापूर, दशरथ मुंडे, अविनाश पोतदार, अभिजीत पराते, एकनाथ जगताप आदींसह ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाकणे यांचा मित्र मंडळाकडून सत्कार



**लिंपणगाव :** चांडगावचे सुपुत्र तथा सध्या पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, आढळगाव येथे कार्यरत असलेले मच्छिंद्र भगवान चाकणे यांना रयत शिक्षण संस्थेचा प्रतिष्ठेचा माजी प्राचार्य एन. आर. माने निष्ठावान गुणी रयत सेवक पुरस्कार २०२६ जाहीर झाल्याबद्दल त्यांचा राजेंद्र म्हस्के मित्र मंडळाच्या वतीने चांडगाव येथे जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमावेळी राजेंद्र म्हस्के यांनी आपल्या मनोगतातून मा. चाकणे यांच्या कार्याचा विशेष गौरव करताना सांगितले की, शिक्षण क्षेत्रात निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान होणे ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे. मच्छिंद्र चाकणे यांनी विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कारांची जोपासना करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले असून, त्यांना मिळालेला हा पुरस्कार संपूर्ण परिसरासाठी गौरवास्पद आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही. चाकणे यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.

या कार्यक्रमास राजेंद्र म्हस्के, सरपंच शशिकांत जगताप, उपसरपंच महादेव म्हस्के, स्कूल कमिटी सदस्य दत्तात्रय वाघ, माजी व्हा. चेअरमन शिवाजीराव खामकर, व्हा. चेअरमन पंढरीनाथ चाकणे, युवा नेते प्रमोद म्हस्के, संतोष म्हस्के, संतोष शिवदास म्हस्के, युवा नेते अजित म्हस्के, संचालक बाळासाहेब लोंढे, सतीश म्हस्के, सोसायटी संचालक महेंद्र म्हस्के, संचालक भाऊसाहेब चाकणे, संचालक सुनील म्हस्के, न्यू इंग्लिश स्कूलचे प्रा. गायकवाड, माऊली महाराज म्हस्के यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात मच्छिंद्र चाकणे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

# लाडक्या बहिणींच्या हाकेला धावले बाफना

## उशिराची एसटी वेळेत ; महिला प्रवाशांना दिलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** रत्नापूर, पाटोदा, अरणगाव, माहिजळगाव ते कर्जत दरम्यान धावणारी सायंकाळची एसटी बस गेल्या काही दिवसांपासून तब्बल दोन तास उशिराने येत असल्याने महिला प्रवासी, विद्यार्थिनी तसेच नोकरदार वर्गाला मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. शिवसेना युवा नेते आकाश बाफना यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर अखेर ही बससेवा वेळेत सुरू करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील रत्नापूर,पाटोदा,अरणगाव या ठिकाणतील अनेक प्रवासी महिला जामखेड शहरात नोकरी, शिक्षण व व्यवसायानिमित्त ये-जा करतात. मात्र बस उशिराने येत असल्यामुळे महिलांना रात्री उशिरापर्यंत बसस्थानकावर थांबावे होते.



त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला होता. अनेक दिवस संबंधित समस्येबाबत तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याने महिला प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी होती.

गेल्या अनेक दिवसांपासून महिलांनी अनेक जणांकडे याबाबत तक्रार केली परंतु कोणीही प्रतिसाद दिला नाही. अखेर महिलांनी आपली समस्या शिवसेना युवा नेते आकाश बाफना यांच्यासमोर मांडल्यानंतर त्यांनी जामखेड आगाराचे सहायक वाहतूक निरीक्षक सुरेंद्र कंठाळे यांना निवेदन दिले. तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी जामखेड बसस्थानकावर विशेष सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी केली.

याशिवाय अहिल्यानगर येथील वाहतूक नियंत्रक रविंद्र जगताप यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून बससेवा पूर्ववत वेळेत सुरू करण्याची मागणी केली.

प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेत सायंकाळची बस वेळेत सुरू केली. त्यानंतर आकाश बाफना यांनी बसस्थानकावर प्रत्यक्ष भेट देऊन बस वेळेत येत असल्याची पाहणी केली. तसेच प्रवाशांशी संवाद साधून इतर समस्यांची माहितीही जाणून घेतली.

महिला प्रवाशांचा प्रवासाचा प्रश्न मार्गी लागल्याने बाफना यांनी जामखेड आगाराचे आभार मानले. यावेळी उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त करत आकाश बाफना यांचे आभार मानले.

यावेळी शिवा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शिवकुमार डोंगरे,जामखेड एसटी आगाराचे सहायक वाहतूक निरीक्षक सुरेंद्र कंठाळे, वाहतूक नियंत्रक शिवदास उगले, चालक अनिल चौगुले, वाहक वैभव भांगे, विठ्ठल जायभाय, अशोक कुमटकर, दत्तात्रय जगताप, अनिकेत देशमुख तसेच प्रवासी मोनिका सरकाळे,सारीका वारे,दिपाली शेख ,अनिता जाधव आदी महिला प्रवासी उपस्थित होते.


# दुर्धर आजारग्रस्तांसाठी 'पॉलिएटीव्ह केअर' योजना

## जिल्ह्यात ३६०९ रुग्णांची नोंद; ४६१ कर्करुग्णांचा समावेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दुर्धर आजारामुळे अंथरुणाला खिळलेल्या आणि स्वतःची काळजी घेणे अशक्य झालेल्या रुग्णांचे उर्वरित आयुष्य सुखकर व वेदनारहित करण्यासाठी आरोग्य विभागाने 'पॉलिएटीव्ह केअर' योजना सुरू केली आहे. जिल्ह्यात अशा प्रकारचे ३ हजार ६०९ रुग्ण आढळून आले असून त्यामध्ये ४६१ कर्करुग्णांचा समावेश आहे.

आरोग्य विभागाने गेल्या महिन्यात जिल्हाभर विशेष सर्वे



क्षण मोहीम राबवून ही माहिती संकलित केली. 'पॉलिएटीव्ह केअर' कार्यक्रमांतर्गत जिल्हा शासकीय रुग्णालयात १० खाटा, तर ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये प्रत्येकी २ खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच अशा रुग्णांवर समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत घरपोच उपचार केले जाणार आहेत.

जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्करोग, हृदयरोग, दमा, सांधेदुखी, मानसिक विकलांगता, मतिमंदता तसेच वयोमानामुळे असहाय्य झालेल्या रुग्णांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. रुग्णांच्या वेदना कमी करण्यासोबतच त्यांच्या कुटुंबीयांवरील मानसिक ताण कमी करण्याचाही प्रयत्न या योजनेतून केला जाणार आहे.

सर्वेक्षणात आढळलेल्या रुग्णांमध्ये ३५६ तीव्र, १ हजार ३४ मध्यम आणि २ हजार २१९ सौम्य स्वरूपाचे रुग्ण आहेत. सौम्य रुग्णांची महिन्यातून एकदा, मध्यम रुग्णांची १५ दिवसांतून एकदा तर तीव्र रुग्णांची दर आठवड्याला तपासणी करण्यात येणार आहे.

दरम्यान, तोंडाच्या कर्करोगाचे २७६, स्तनाच्या कर्करोगाचे १०६ आणि गर्भाशयाच्या कर्करोगाचे ७६ रुग्ण या सर्वे क्षणात आढळले आहेत. आरोग्य विभागाने नागरिकांना अशा रुग्णांची माहिती स्थानिक आशा कर्मचारी, आरोग्य कर्मचारी किंवा समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण समितीवर सविता मोरे

**अहिल्यानगर :** जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये सामाजिक कार्यकर्त्या सविता मोरे यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पालकमंत्री तथा समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मोरे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दिलीप भालसिंग, बाबासाहेब सानप यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राज्य शासनाच्या वतीने जिल्हा रुग्णालयांमधील आरोग्यसेवा अधिक सक्षम, प्रभावी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी सुलभ करण्याच्या उद्देशाने संनियंत्रण व सल्लागार समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमध्ये विविध विभागांतील अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात आला असून, रुग्णालयातील सेवा, सुविधा, प्रशासन आणि रुग्णांच्या समस्या यावर प्रभावीपणे लक्ष ठेवण्याची जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे. समिती मधील सदस्य जिल्हा रुग्णालयातील औषध पुरवठा, स्वच्छता व्यवस्था, रुग्णांना उपलब्ध होणाऱ्या सुविधा, वैद्यकीय यंत्रणेचे कामकाज तसेच नागरिकांच्या तक्रारी प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यास मदत करणार आहे.

द • ख • ल

## मायलेक एकाच वेळी दहावी पास आईला ५१ टक्के तर मुलाला ६४.८० टक्के

**भोर :** भोलावडे (ता.भोर) येथील गीता रवींद्र डोंबे आणि रुद्र रवींद्र डोंबे या मायलेकराने एकाच वेळी दहावीची बोर्ड परीक्षा पास केली असून शिक्षणाला वयाचे बंधन नसते हे दाखवून दिले आहे.या मायलेकराने फेब्रवारी २०२६ मध्ये दहावीची बोर्ड परीक्षा दिली.रुद्र हा राजा रघूनाथराव विद्यालयाचा विद्यार्थी असून त्याची आई गीता




या गृहिणी आहेत.मात्र मुलाचा अभ्यास घेताना त्यांना अभ्यासाची गोडी लागली आणि १७ नंबरचा परीक्षा अर्ज भरून दहावीची परीक्षा द्यायची हे ठरले.मायलेक दोघांनी एकमेकांच्या मदतीने शंकांचे निरसन करत एकत्र अभ्यास केला.दहावी बोर्ड परीक्षेत गीता यांना ५१ टक्के तर मुलगा रुद्र याला ६४.८० टक्के गुण मिळाले आहेत. गीता यांना १२ वर्षांपूर्वी घरगुती अडचणींमुळे अर्धवट शिक्षण सोडावे लागले होते.मात्र पती रवींद्र यांची यांची मोलाची साथ आणि सासू तुळसाबाई यांचा पाठिंबा यामुळे हे शक्य झाल्याचे गीता यांनी सांगितले.माय लेकाच्या यशाबद्दल कुटुंबीयांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला.राजा रघुनाथराव विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण भांगे ,शिक्षक सोमनाथ कुंभार ,अनिल जावीर ,एम .एम. रंकाळे ,ज्ञानेश्वर शेडगे,कार्यालय प्रमुख अनंता शिर्के यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले

## मान्सूनपूर्व पावसाच्या प्रतीक्षेत दिवे परिसरातील शेतकरी

**दिवे, पुरंदर :** दिवे परिसरातील शेतकऱ्यांनी शेतीत आधुनिक पद्धतींचा अवलंब करत नगदी पिकांकडे मोठ्या प्रमाणात मोर्चा वळविला आहे. काही शेतकऱ्यांनी पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या पाण्यावर तर काहींनी शेततळ्यांच्या माध्यमातून भाजीपाला, फळबागा व इतर नगदी पिकांची लागवड केली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या कडक उन्हामुळे पिकांवर मोठा परिणाम होत असून शेतकरी चिंतेत सापडले आहेत. सध्या तापमानात मोठी वाढ झाल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे



शेतकऱ्यांना दररोज पिकांना पाणी द्यावे लागत आहे. तरीदेखील अनेक ठिकाणी पिके करपण्यास सुरुवात झाली असून वाढ खुंटत असल्याचे चित्र दिसत आहे.तर सिताफळाच्या उन्हाळि बहरात उष्णतेमुळे बागेत अत्यल्प फलधारणा झाली आहे भाजीपाला व फुलपिकांवर देखील उष्णतेचा मोठा परिणाम जाणवत आहे चिंचावले परिसरात पुरंदर उपसा झलसिंचन योजनेची पाईपलाईन फुटल्याने पाणीटंचाई जाणवत असून पिकांची अपेक्षित वाढ होत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा कठीण परिस्थितीत आता शेतकऱ्यांचे लक्ष मान्सूनपूर्व पावसाकडे लागले आहे. लवकरच चांगला पाऊस झाल्यास पिकांना दिलासा मिळून वाढीस चालना मिळेल, अशी आशा शेतकरी व्यक्त करत आहेत. परिसरात ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने बळीराजा चिंतेत आहे....

## विभागीय आयुक्त कार्यालयात लोकशाही दिनात चार प्रकरणांवर सुनावणी

**पुणे :** विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विभागीय लोकशाही दिनात पुणे जिल्ह्यातील चार प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यावेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महासंचालक सुनील फुलारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, तक्रारदार उपस्थित होते. जिल्हा स्तरावर येणाऱ्या तक्रार अर्जांवर जिल्हास्तरीय लोकशाही दिनात उचित कार्यवाही होणे आवश्यक असून त्यासाठी निर्णय देताना नियम व कायद्याच्या तरतुदीचे पालन करावे, अशा सूचना डॉ.पुलकुंडवार यांनी दिल्या. विभागातील सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून न्याय्य पद्धतीने व तत्परतेने सोडवणूक करण्यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या लोकशाही दिनात नव्याने दाखल चार प्रकरणांचा समावेश होता. या अर्जदारांना तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबतच्या कागदपत्रांसह आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन श्री. पुलकुंडवार यांनी सुनावणी घेतली.

## चिचोंली परिसरात घरफोडी ; २ लाख ९ हजार रुपयांचा ऐवज लंपास

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील चिचोंली कोकणे परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत तब्बल २ लाख ९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना दि.१०/५/२०२६ रोजी रात्री घडली आहे. याबाबत सोपान किसन झोडगे यांनी घोडेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अज्ञात चार चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की चिंचोली कोकणे येथे अज्ञात चार चोरट्यांनी शिवाजी तुकाराम झोडगे, व ज्ञानेश्वर झुंबर शेगर यांच्या घराचे कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश करत रोख रक्कम व दागिने चोरून नेले आहेत. तसेच बाजूचे मनीष किसन बारवे यांच्या घरी सुद्धा घरपोडीचा प्रयत्न झाला आहे. या घरफोडीत चोरट्यांनी शिवाजी तुकाराम झोडगे यांच्या घरातून ३० हजार रुपये रोख रक्कम, तर ज्ञानेश्वर झुंबर शेगर यांच्या घरातून अंदाजे १ लाख ७५ हजार रुपये किमतीचे साडेतीन तोळ्यांचे सोन्याचे गंठन, गळ्यातील सोन्याची पोत तसेच ४ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण २ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

# जमिनीचे तुकडे मंजुरीशिवाय विकता येणार नाही : महसूलमंत्री बावनकुळे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** ''निवासी क्षेत्रात ऑक्टोबर २०२४ पूर्वी झालेले जमिनीचे तुकडे सरकारने मान्य केले आहेत. मात्र, त्यानंतर कोणताही तुकडा अधिकृत लेआऊट मंजुरीशिवाय विकता येणार नाही. महापालिका किंवा संबंधित प्राधिकरणांची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. अन्यथा कठोर गुन्हे दाखल केले जातील,'' असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी दिला. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. भूसंपादनाबाबत ते म्हणाले, भूसंपादनाची माहिती अगोदरच मिळवून काही व्यापारी आणि संबंधितांनी जमिनींची खरेदी-विक्री केल्याचे प्रकार सरकारच्या निदर्शनास आले असून अशा व्यवहारांची सखोल चौकशी सुरू आहे. गुगल मॅप्स, वर्षभरातील नोंदणी व्यवहार आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे. गैरव्यवहार करणाऱ्यांना एक रुपयाही भरपाई मिळू दिली जाणार नाही'' बावनकुळे म्हणाले, ''राज्यात जुलैपासून लॅण्ड टायटलिंग ऍक्ट लागू करण्याचा सरकारचा मानस आहे. सध्याचा सातबारा किंवा प्रॉपर्टी कार्ड अंतिम मालकी दर्शवत नाही. तो केवळ नोंदणीचा पुरावा आहे. नवीन कायद्यामुळे नागरिकांना निश्चित मालकी हक्क मिळेल. ऑनलाइन व्यवहार, बोजा नोंदणी आणि थेट व्यवहारामुळे मध्यस्थांची गरज उरणार नाही. महाराष्ट्र हा देशातील पहिला लॅण्ड टायटलिंग कायदा लागू करणारा राज्य ठरेल,'' असा दावा त्यांनी केला. पेट्रोल-डिझेल बचतीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाचे समर्थन करताना बावनकुळे म्हणाले, ''इथेनॉल, सौर ऊर्जा आणि स्वदेशी पर्यायांचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे. बचत हा भारतीय संस्कारांचा भाग आहे.'' तर मुंढवा प्रकरणाबाबत ते म्हणाले, ''सरकारने रजिस्ट्रेशन कायद्यानुसार कारवाई केली आहे. सरकारी मालमत्ता बळकावण्याचे प्रकार पुन्हा होऊ नयेत, यासाठी कठोर नियमावली तयार केली आहे,'' असेही बावनकुळे यांनी सांगितले.

### शुद्धलेखनाचा अधिकाराचा गैरवापर...

**कलम १५५ च्या गैरवापराबाबत सरकारने कठोर भूमिका घेतल्याचेही सांगत बावनकुळे म्हणाले, ''शुद्धलेखन दुरुस्तीसाठी असलेला अधिकार वापरून काही अधिकाऱ्यांनी जमिनींची नावे बदलली. राज्यभरातील सुमारे दोन हजार तहसीलदारांच्या कामकाजाचे पुनर्विलोकन सुरू आहे. चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेल्या नोंदी रद्द करण्याची प्रक्रिया हाती घेतली आहे.''**

**बावनकुळे म्हणाले...**

**– देवस्थान जमिनींसंदर्भात सरकार प्रारूप कायदा**

**– शंभर वर्षांपासून वहीवाट किंवा कुळ हक्क असलेल्या जमिनींबाबत निश्चित धोरण आणण्याची गरज**

**– देवस्थानांचे हक्क अबाधित ठेवून, वहीवाटदारांचे अधिकार निश्चित करण्याचा प्रयत्न आहे.**

**– पुण्यातील ४० अधिकाऱ्यांच्या संदर्भात कारवाईची प्रक्रिया सुरू असून, विधी व न्याय विभागाचा अभिप्राय आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.**

# नागापूरमध्ये विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

## वनविभागाच्या धाडसी रेस्क्यूमुळे थरारक बचावकार्य यशस्वी



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील नागापूर गावात आज सकाळी एक थरारक घटना घडली. येथील शेतकरी सूर्यकांत भिकाजी दळे यांच्या शेतातील विहिरीत अंदाजे एक ते दीड वर्ष वयाची मादी बिबट्या पडल्याचे निदर्शनास आले. विहिरीत बिबट्या असल्याची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. काही काळ गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी तात्काळ वनविभागाला माहिती दिल्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक पोत्रे, रेस्क्यू टीम सदस्य तसेच बेस कॅम्पचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. विहिरीची खोली, बिबट्याची घाबरलेली अवस्था आणि परिसरातील गर्दी यामुळे बचावकार्य मोठे आव्हानात्मक ठरत होते. वनविभागाच्या पथकाने अत्यंत सावधगिरीने आणि शिताफीने रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले. बिबट्याला कोणतीही इजा होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली. काही वेळ चाललेल्या अथक प्रयत्नांनंतर अखेर मादी बिबट्याला सुखरूप बाहेर काढण्यात वनविभागाला यश आले. या क्षणी उपस्थित नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकत वन कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले.

वनविभागाच्या प्राथमिक माहितीनुसार, सदर मादी बिबट्या अंदाजे एक ते दीड वर्ष वयाची असून तिला कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही. पुढील वैद्यकीय तपासणी आणि निरीक्षणासाठी तिला सुरक्षितरित्या माणिकडोह बिबट निवारण केंद्रात हलवण्यात आले आहे. दरम्यान, नागापूर परिसरात वारंवार वन्यप्राण्यांचा वावर वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पाण्याच्या शोधात किंवा भक्ष्याच्या मागावर बिबटे मानवी वस्त्यांच्या दिशेने येत असल्याची शक्यता वनविभागाने व्यक्त केली आहे. नागरिकांनी अफवा पसरवू नयेत तसेच वन्यप्राणी दिसल्यास तत्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

वनविभागाच्या तत्परतेमुळे एका दुर्मिळ वन्यजीवाचे प्राण वाचल्याने परिसरातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## जमीन विक्रीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील भूमिहीन व दारिद्र्य रेषेखालील शेतमजुरांच्या आर्थिक सबळीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दोन एकर बागायती किंवा चार एकर जिरायती जमीन १०० टक्के शासन अनुदान तत्त्वावर उपलब्ध करून दिली जाते. या योजनेंतर्गत कसण्यायोग्य जमीन विक्री करण्यास इच्छुक असलेल्या जमीन मालकांनी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रे विहित नमुन्यातील अर्ज. शेतजमीन विक्रीबाबत तहसीलदार कार्यालयाकडे केलेले मूळ प्रतिज्ञापत्र. सक्षम प्राधिकाऱ्यांचा ७/१२ चा मूळ उतारा. ८ अ उतारा व डायरी उतारा. वारसांचे/कुटुंबातील सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र. जमिनीवर कोणताही बोजा नसल्याबाबत तलाठी यांचे प्रमाणपत्र. सहकारी व राष्ट्रीयीकृत बँकांचे थकबाकी नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र. कृषि पतपुरवठा करणाऱ्या बँकांचे थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. मोजणी विभागाचा टाचण व नकाशासह अहवाल. जमीन खरेदी प्रक्रिया व नुकसानभरपाईबाबत रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवरील शपथपत्र. सदर जमिनीबाबत कोणताही न्यायालयीन वाद नसल्याचे प्रमाणपत्र. जमिनीचा वकिलांचा शोध अहवाल (डशरऍलह ठर्शोंऔं) इ. संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज संबंधित कार्यालयात सादर करावेत, असे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी कळविले आहे. अर्ज करण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण जिल्हा पुणे कार्यालय, सामाजिक न्याय भवन, सर्वे नं. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे – ४११००६. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२९७०६६११ वर संपर्क साधावा.

# स्वच्छतादूत बनून 'रियुजेबल' वस्तूंचा वापर वाढवावा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



ग्रामसंसद समृद्धी शिखर परिषदेत मार्गदर्शन करताना यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी. व्यासपीठावर डॉ. सुमंत पांडे, फोरम ऑफ इंटलेक्युअल्सचे अध्यक्ष सतिश देशमुख, नियोजन समितीचे सदस्य डॉ. दिपक गायकवाड, कॉ. किशोर ढमाले आदी उपस्थित होते.

**पुणे :** गेल्या काही वर्षात गावागावांत वाढत चाललेल्या कचऱ्याच्या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून नागरिकांनी स्वच्छतादूत बनून 'रियुजेबल' वस्तूंचा वापर वाढवावा, असे आवाहन यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले. फोरम ऑफ इंटलेक्च्युअल्स, ग्रामगौरव प्रतिष्ठान, समन्यायी पाणी हक्क परिषद आणि ग्रामस्वराज्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता. १०) आयोजित करण्यात आलेल्या 'ग्रामसंसद समृद्धी शिखर परिषदेत' ते बोलत होते. यावेळी यशदातील जलसाक्षरता अभियानाचे माजी कार्यकारी संचालक डॉ. सुमंत पांडे, नियोजन समितीचे सदस्य डॉ. दिपक गायकवाड, सत्यशोधक शेतकरी सभेचे राज्य संघटक कॉ. किशोर ढमाले आदी उपस्थित होते. डॉ. कलशेट्टी म्हणाले, की शासनाने स्वच्छतेसंदर्भातील विविध योजना राबविल्या असून ग्रामपंचायत स्तरावर कचरा संकलन मोहिमा सुरू आहेत. सामाजिक संस्थांचाही यात सहभाग वाढत आहे. मात्र, कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी नागरिकांनी घराघरांत कचऱ्याचे विलगीकरण करणे आवश्यक आहे. ओला व सुका कचरा वेगळा केल्यास कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊ शकते. यासाठी शासनाकडून विविध पुरस्कार, योजनाही जाहीर करण्यात आल्या आहेत. गावाच्या विकासाचे गुणांकन दर्शविणारा तक्ता ग्रामपंचायतीमध्ये लावणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांना गावाची सद्यस्थिती समजण्यास मदत होईल. गुणांकनाच्या आधारे गावांना पुरस्कार व निधी मिळणार असून त्या निधीचा योग्य वापर केल्यास पुढील विकासासाठी अधिक निधी उपलब्ध होऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. यशदातील जलसाक्षरता अभियानाचे माजी कार्यकारी संचालक डॉ. सुमंत पांडे म्हणाले, की गावाच्या विकासासाठी राज्य वित्त आयोगाच्या विविध योजनांमधून निधी मिळविता येतो. त्याचबरोबर ग्रामपंचायतीने स्वतःचे उत्पन्न वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे. उत्पन्नाचे नवे स्रोत शोधून शासनाच्या नियमावलीनुसार कर आकारणीची प्रभावी अंमलबजावणी करावी. ते पुढे म्हणाले, की कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून गावाच्या पुढील दहा ते वीस वर्षांतील विकासाचा आराखडा तयार करता येऊ शकतो. त्यासाठी लोकप्रतिनिधींनी जागरूक राहून आवश्यक असल्यास प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. सत्यशोधक शेतकरी सभेचे राज्य संघटक कॉ. किशोर ढमाले म्हणाले की, पेसा आणि वनहक्क हे दोन्ही कायदे वीस ते तीस वर्षांपासून आहे. हे जे कायदे झाले ते ब्रिटिशकाळात व स्वातंत्र्यपूर्व काळात महसूलच्या तरतुदीनुसार आदिवासीसाठी झाले आहे. ब्रिटिशानी ते लिखित स्वरूपात लिहून ठेवले आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. परंतु त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले आहे, ही दुर्दैवी बाब आहे. परिषदेत फोरम ऑफ इंटलेक्युअल्सचे अध्यक्ष सतिश देशमुख प्रास्तविक व आभार मानले.

# शिरूर नगरपरिषदेस अत्याधुनिक 'मिनी रेस्क्यू टेंडर' वाहन प्राप्त

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** शहरातील नागरिकांची सुरक्षा ही आमची प्राथमिकता आहे.आगीच्या घटना असो किंवा इतर कोणतीही आपत्ती, हे नवीन मिनी रेस्क्यू टेंडर वाहन कमीत कमी वेळेत घटनास्थळी पोहोचून मदत कार्यास वेग देईल.महाराष्ट्र अग्निशमन संचालनालयाने हे वाहन उपलब्ध करून दिल्याने शहराच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला मोठे बळ मिळाले आहे.या नवीन वाहनामुळे शिरूर शहराच्या अग्निशमन दलाची कार्यक्षमता अधिक वाढणार असल्याचे मत नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांनी व्यक्त केले.

शिरूर शहराची वाढती व्याप्ती आणि आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून,महाराष्ट्र अग्निशमन संचालनालयाकडून शिरूर नगरपरिषदेस अत्याधुनिक 'मिनी रेस्क्यू टेंडर' वाहन प्राप्त झाले आहे.या नवीन रेस्क्यू टेंडरचे लोकार्पण शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांच्या हस्ते झाले यावेळी त्या बोलत होत्या.

### वैशिष्ट्ये आणि उपयुक्तता:

हे वाहन आकाराने लहान असल्याने शहरातील अरुंद गल्ल्या आणि गर्दीच्या ठिकाणी जलद गतीने पोहोचण्यास सक्षम आहे.यामध्ये आपत्कालीन शोध व बचाव कार्यासाठी लागणारी अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत.जसे की :

* बचाव कार्य उपकरणे: कटर, स्प्रेडर आणि प्रथमोपचार किट.
* अग्निशमन यंत्रणा: उच्च दाबाचा पाण्याचा पंप आणि होज रील.
* प्रकाश व्यवस्था : रात्रीच्या वेळी शोधकार्यासाठी हाय-इंटेंसिटी लाइट्स.



यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,नियोजन व विकास गृहनिर्माण,टपरी व झोपडपट्टी पुनर्वसन समिती सभापती स्वाती साठे,सार्वजनिक बांधकाम समिती सभापती सुनिल जाधव,स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती सभापती एजाज बागवान,महिला व बालकल्याण समिती उपसभापती स्वप्नाली जामदार,नगरसेविका संगीता मल्लाव,चारुशिला कोळपकर नगरसेवक निलेश गाडेकर,संतोष थेऊरकर,सागर नरवडे,अभिजीत पाचर्णे यांसह प्रशासकीय अधिकारी राहुल पिसाळ,सचिन वाळूंज,अग्निशमन अधिकारी महेश कदम,लिपिक व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रणव बढे याचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**शिरूर:-** शिरूर शहरातील पत्रकार व पारनेर तालुक्यातील जातेगाव येथिल भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष यांचा सुपुत्र तथा विद्याधाम प्रशाला, शिरूर येथील विद्यार्थी प्रणव अर्जुन बढे याने इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये तब्बल ९७.४० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या या उज्वल यशामुळे शिरूर शहरासह परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. अत्यंत जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर प्रणवने हे यश मिळवले आहे. अभ्यासासोबतच वेळेचे योग्य नियोजन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांचा पाठिंबा यामुळे त्याला हे यश प्राप्त झाले. विद्यार्थीदशेत शांत, अभ्यासू आणि मेहनती स्वभावामुळे तो शाळेमध्ये नेहमीच शिक्षकांचा आवडता विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. प्रणव बढे यांच्या या यशामध्ये विद्याधाम प्रशाला, शिरूरचे मुख्याध्यापक गुरुदत्त पाचर्णे, वर्गशिक्षक मंगल भालेकर मॅडम तसेच कवाष्टे क्लासेसचे प्रसाद कवाष्टे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रणवने अभ्यासाची योग्य दिशा ठरवत सातत्याने मेहनत घेत उत्कृष्ट यश संपादन केले. प्रणवच्या या यशाबद्दल शिरूरचे आमदार ज्ञानेश्वर कटके, पारनेर तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते माजी आमदार अशोक पवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदिप कंद, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस सिताराम लांडगे, शिरूर पंचायत समितीच्या सभापती स्वाती विठ्ठल घावटे, शिरूर नगरपालिका बांधकाम समितीचे सभापती सुनिल जाधव तसेच शिरूर तालुक्यातील पत्रकार मित्र, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी प्रणवचे अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. प्रणव बढे यांच्या या यशामुळे बढे कुटुंबीयांचा सन्मान वाढला असून शिरूर शहराच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# पुरंदर महसूलचा 'स्ट्राईक रेट' सासवडमध्ये १२९० कामांचा निपटारा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** पुरंदर महसूल विभागाने सासवड येथे आयोजित 'महाराजस्व समाधान' शिबिरातून गतीमान प्रशासनाचे उदाहरण घालून दिले. पुरंदर तहसील कार्यालयाचे तहसीलदार विक्रम राजपूत यांच्या नियोजनातून आणि सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदी जगताप यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या शिबिरात एकाच दिवसात तब्बल १,२९० प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहात झालेल्या या शिबिराला विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथील रोहयो उपायुक्त संजीव पलांडे, पुरंदर तहसील कार्यालयाचे तहसीलदार विक्रम राजपूत, सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदी जगताप, सासवड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीधर चव्हाण आणि पुरंदर तहसील कार्यालयाचे निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील उपस्थित होते.

तहसीलदार विक्रम राजपूत यांनी सर्व विभागांना 'झिरो पेंडन्सी'चे उद्दिष्ट दिल्यानंतर महसूल, लोकसेवा हक्क, सामाजिक सुरक्षा आणि कृषी योजनांतील प्रकरणांचा वेगाने निपटारा करण्यात आला. महसूल विभागामार्फत प्रलंबित फेरफार ६७, ७/१२ दुरुस्ती १९, जिवंत ७/१२ वितरण ४४, डिजिटल ७/१२ वितरण ३०३, ८-अ उतारे २६८, भूसंपादन कमी-जास्त पत्रके २६, वर्ग-२ जमीन वर्ग-१ करण्याची १३, तुकडेबंदी नियमितीकरणाची २२, अकृषिक कमी-जास्त पत्रके २४ आणि अकृषिक अधिमूल्य वसुलीची १० प्रकरणे निकाली काढण्यात आली.

लोकसेवा हक्कांतर्गत जात प्रमाणपत्र २९, नॉन-क्रीमीलेअर दाखले १२, उत्पन्न दाखले ५२, रहिवास व अधिवास प्रमाणपत्रे ६० आणि रेशनकार्डसंदर्भातील ५ सेवा तत्काळ देण्यात आल्या. सामाजिक सुरक्षा व कृषी योजनांमध्ये संजय गांधी योजना ९, श्रावण बाळ योजना ४, ई-मोजणी १३, ॲग्रीस्टॅक ६५, पीएम किसान १० आणि तक्रार निवारणाची २३५ प्रकरणे मार्गी लावण्यात आली.


नगराध्यक्षा आनंदी जगताप यांनी प्रशासनाच्या गतीमान कामकाजाचे कौतुक करताना, प्रशासन लोकांच्या दारी पोहोचल्यास सामान्य नागरिकांना न्याय मिळतो, असे सांगितले. तहसीलदार विक्रम राजपूत यांनी डिजिटल सातबारा आणि 'इज ऑफ डुईंग बिझनेस' संकल्पनेबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले. सर्वसामान्यांचे प्रश्न विहित वेळेत सोडविणे हेच प्रशासनाचे उद्दिष्ट आहे. शिबिरातील १,२९० लाभार्थी हे महसूल विभाग आणि नगरपरिषद प्रशासनाच्या समन्वयाचे यश आहे, असे तहसीलदार विक्रम राजपूत यांनी सांगितले.

महसूल, कृषी आणि नगरपरिषद विभागांच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचला. शिबिरामुळे सासवड परिसरातील शेतकरी, विद्यार्थी आणि निराधार नागरिकांनी प्रशासनाबद्दल समाधान व्यक्त केले.

# सासवडचा पाणीपुरवठा सुरळीत होणार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** वीर योजनेची फुटलेली जलवाहिनी आणि खंडीत विजपुरवठ्यामुळे सासवडचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. यावर उपाय म्हणून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वीर योजनेच्या जॅकवेलवर उच्च क्षमतेचा जनरेटर बसविण्यात आला आहे. यामुळे वीज खंडित झाली तरी पाणी उपसा सुरू राहणार असून, विस्कळीत झालेला पाणीपुरवठा आता सुरळीत होणार असल्याची माहिती माजी आमदार संजय जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली. याबाबत बोलताना माजी आमदार जगताप यांनी, सध्या गराडे आणि घोरवडी हे दोन्ही तलाव कोरडे पडल्याने शहर पूर्णपणे वीर योजनेवर अवलंबून आहे. मात्र, पुणे आणि सातारा जिल्ह्यातील भारनियमनाच्या वेगवेगळ्या वेळा आणि तांत्रिक बिघाडामुळे पाणीपुरवठ्यात व्यत्यय येत होता. यावर उपाय म्हणून ७५० केव्ही क्षमतेचा जनरेटर शनिवारी कार्यान्वित करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप यांच्यासह नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, राजन जगताप, प्रदीप राऊत उपस्थित होते. भविष्यात पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी 'अमृत २' योजनेतून १४३ कोटींच्या प्रकल्पास मंजुरी मिळाली आहे. यामध्ये नवीन जलवाहिन्या, १० लाख लिटरच्या ४ टाक्या, पांगारे खिंडीत जलशुद्धीकरण केंद्र आणि २०० एमएलडी क्षमतेचा साठवण तलाव उभारला जाणार आहे. याशिवाय जॅकवेलवर सौरऊर्जा प्रकल्प आणि कांबळवाडी पंप हाऊसवरही जनरेटर बसवण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



## द•ख•ल

### प्रणव बढे याला एसएससी परीक्षेत ९७.४०% गुण



**वाडेगव्हाण :** वाडेगव्हाणचे पत्रकार व भैरवनाथ देवस्थानचे जातेगाव चे अध्यक्ष अर्जुन बढे यांचा सुपुत्र तथा विद्याधाम प्रशाला, शिरूर येथील विद्यार्थी प्रणव अर्जुन बढे याने इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये तब्बल ९७.४० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामुळे शिरूर शहरासह परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. अत्यंत जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर प्रणवने हे यश मिळवले आहे. अभ्यासासोबतच वेळेचे योग्य नियोजन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांचा पाठिंबा यामुळे त्याला हे यश प्राप्त झाले. विद्यार्थीदशेत शांत, अभ्यासू आणि मेहनती स्वभावामुळे तो शाळेमध्ये नेहमीच शिक्षकांचा आवडता विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. प्रणव बढे यांच्या या यशामध्ये विद्याधाम प्रशाला, शिरूरचे मुख्याध्यापक गुरुदत्त पाचर्णे, वर्गशिक्षक मंगल भालेकर मॅडम तसेच कवाष्टे क्लासेसचे प्रसाद कवाष्टे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रणवच्या या यशाबद्दल शिरूरचे आ. ज्ञानेश्वर कटके, पारनेरचे आ. काशिनाथ दाते मा.आ.अशोक पवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदिप कंद, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस सिताराम लांडगे, शिरूर पंचायत समितीच्या सभापती स्वाती विठ्ठल घावटे, शिरूर नगरपालिका बांधकाम समितीचे सभापती सुनिल जाधव तसेच शिरूर तालुक्यातील पत्रकार मित्र, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी प्रणवचे अभिनंदन केले. प्रणव बढे यांच्या या यशामुळे बढे कुटुंबीयांचा सन्मान वाढला आहे.


### आदित्य सुपेकर यास पोलिस कोठडी

**निघोज :** गाडीची काच फोडून दोन लाख रुपये लंपास करणाऱ्या पठारवाडी येथील आदित्य राजेंद्र सुपेकर यास पारनेर पोलीसांनी सहा महिन्यांनंतर नुकतीच अटक केली आहे .आदित्य यास पाच दिवसाची पोलीस कोठडी न्यायालयाने दिली आहे. याबाबत तपासी अधिकारी म्हणून पी एस आय कोळपे अधिक तपास करीत आहेत. याबाबत राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात झाल्याने पोलीसांना कारवाईसाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र फिर्यादी मोहन बबन पवार यांनी सातत्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केल्याने सुपेकर याच्यावर धडक कारवाई करण्यात आली. याबाबत अधिक माहिती अशी आहे की, ठेकेदार मोहन बबन पवार यांनी चारचाकी वाहन घराजवळ लावले होते. तसेच यामध्ये १ लाख ९६ हजार होते.पुन्हा ते वाहन घेऊन लगेच जाणार असल्याने पैसे गाडीत ठेवले. मात्र आरोपी आदित्य सुपेकर याने याच संधीचा फायदा उठवीत गाडीची काच फोडून पैसे लांबवले. याबाबतची फिर्याद पवार यांनी पारनेर पोलिस स्टेशनमध्ये दिली. मात्र आदित्य सुपेकर याला काही राजकीय व्यक्तींनी पाठींबा दिल्याने पोलीसांना कारवाई करण्यामध्ये अडचणी निर्माण होत होती मात्र गेली सहा महिने पवार यांनी या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आरोपीवर सातत्याने कारवाई करण्याची जोरदार मागणी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे केल्याने तपासी पोलीस अधिकारी पी एस आय कोळपे यांनी नुकतीच आदित्य सुपेकर याला अटक केली. न्यायालयात उभे केले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. सुपेकर याला अटक करुण कारवाई केल्याबद्दल पोलीस अधिकारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे .समाजात दहशत निर्माण करुण लांडी लबाडी करणाऱ्या अशा आरोपींना पोलिसांनी कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# कांद्यासाठी बळीराजाची जीवघेणी धावपळ !

## उन्हाचा कहर ; कांदा वखारीची लगबग ; धरती भाजली पण आशेची पालवी जिवंत

**शशिकांत पवार | राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** उष्णतेचा पारा चढत असताना सर्वसामान्य नागरिक सावलीचा आसरा घेताना पहावयास मिळतात. पण गाव कुसाबाहेरच्या शिवारात ग्रामीण भागात वेगळे चित्र पाहायला मिळत आहे. माथ्यावर आग ओकणारा सूर्य आणि त्याखाली कांद्याच्या ढिगात राबणारा बळीराजा. मोठ्या मेहनतीने पिकविलेला कांदा वखारीत टाकण्यासाठी भर उन्हात शेतकऱ्याची लगबग सुरू आहे.

शेतात काढून ठेवलेला कांदा सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकरी कडक उन्हामध्ये राबताना दिसून येत आहे. उष्माघाताचा धोका तसेच घामाने अंगचिंब भिजत असले तरी शेतकऱ्याचे हात मात्र थांबत नाहीत. कांद्याचे ढीग नीट पसरवणे, कांद्याची प्रतवारीनुसार निवड करणे, गोण्यात भरणे व कांदा साठवणुकीसाठी वखारीत टाकण्यासाठी शेतकरी कुटुंबासह मैदानात उतरला आहे. कोठे महिला कांदा वेचताना दिसतात तर लहान लेकरे गोण्या धरून उभे तर वृद्ध पशुधन सांभाळून शेतात फेरफटका मारताना दिसून येतात.

> शेतकऱ्यांनी कांद्याची गुणवत्ता पाहून कांदा टिकणार असेल तर वखारीत ठेवावा. जुलै ऑगस्ट मध्ये फायदा होऊ शकतो. कांद्याचे बाजारभाव कोसळलेले असल्यामुळे बांधावरील खरेदी मंदावली आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक चक्र हे कांदा पिकावरच अवलंबून असते. बहुतांशी शेतकरी कांदा वखारी मध्ये साठवणूक करण्यात व्यस्त आहेत.
>
> **अक्षय कटारिया (कांदा व्यापारी)**

तालुक्यातील शेतकऱ्यांचे मुख्य पीक म्हणून कांदा पिकाकडे पाहिले जाते. तालुका हा कांद्याचे पठार म्हणून उदयास आला आहे. कांदा पिकावरच शेतकऱ्यांचे वार्षिक गणित अवलंबून असते. कांदा पिकातून मिळणाऱ्या उत्पन्नावरच मुलांच्या शिक्षणाची फी, घरातील किराणा, कर्जाचे हप्ते आणि वर्षभराचा खर्च अवलंबून असतो. म्हणूनच उन्हाच्या प्रखरतेतही कांदा वाचवणे बळीराजासाठी जीवा पेक्षा महत्वाचे ठरत आहे.

कांदा वखारीत टाकण्यासाठी गावोगावी लगबग सुरू आहे. कांद्याला हवा खेळती राहील अशा पद्धतीने साठवणूक करत आहे. निसर्गाचा फटका, बाजाराचा धक्का अन् मजुरीचा वाढलेला खर्च, साठवणुकीची धावपळ यामध्ये बळीराजा अक्षरशा होरपळत आहे. उन्हाने धरती भाजली तरी आगामी काळात कांद्याला चांगला भाव मिळण्याची आशा बळीराजाला आहे.

सद्यस्थितीत कांद्याला हजार ते बाराशे रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. या भावात कांदा विक्री केल्यास झालेला खर्च देखील वसूल होत नाही.

> सुमारे दोन एकर गावरान कांद्याची लागवड केली होती. त्यासाठी एक लाख रुपयांच्या वर खर्च आला. उत्पन्नही चांगल्या प्रमाणात निघाले आहे. परंतु बाजार भाव नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. कांदा वखारीत टाकण्याचे काम सुरू आहे. वखारी मध्ये असलेला कांदा सडण्याची शक्यता असते तसेच वजनातही मोठी घट होते. भाव वाढ झाली नाही तर शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडणार आहे.
>
> **बाळासाहेब देशमुख (शेतकरी, जेऊर)**

ऑगस्ट- सप्टेंबर महिन्यामध्ये कांद्याला चांगला भाव मिळेल या आशेवर बळीराजा उन्हाची तमा न बाळगता कांदा वखारीत साठवण्यास मग्न झाला आहे.

## वाढदिवसाच्या जल्लोष ऐवजी माणुसकीचा उत्सव

### किडनी ग्रस्ताला लाखाची मदत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** आजच्या काळात वाढदिवस म्हटलं की मोठमोठे बॅनर, डीजे, फटाके आणि लाखोंचा दिखाऊ खर्च हे जणू समीकरणच बनलं आहे. पण या सगळ्याला फाटा देत, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा नवा आदर्श प्रसिद्ध उद्योजक तथा 'उपसरपंच चहा' चे संस्थापक अध्यक्ष मिलिंदशेठ भोईटे यांनी समाजासमोर ठेवला आहे.

स्वतःच्या वाढदिवसानिमित्त कोणताही जल्लोष न करता, किडनी विकाराशी झुंज देत जीवन-मरणाच्या संघर्षात असलेल्या संदीप बजरंग घोडके यांच्या कुटुंबाला त्यांनी तब्बल १ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करून प्रत्यक्ष हस्तांतरित केली.

संदीप घोडके यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्याने त्यांच्यावर किडनी प्रत्यारोपणाची वेळ आली आहे. घरची हलाखीची परिस्थिती, दोन लहान मुली आणि एक मुलगा अशा संकटात हे कुटुंब सापडलं आहे. उपचारासाठी लाखो रुपयांची गरज असताना समाजातील संवेदनशील हात मदतीसाठी पुढे येत आहेत.

याच पार्श्वभूमीवर वाढदिवसावर होणारा अनावश्यक खर्च टाळत मिलिंदशेठ भोईटे यांनी थेट मदतीचा हात दिला, आणि समाजात एक सकारात्मक संदेश पोहोचवला.

यावेळी ते म्हणाले, वाढदिवस हा केवळ जल्लोषाचा दिवस नसतो; तो समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याचा दिवसही असतो. एखाद्याच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करता आला, तर त्याहून मोठा आनंद नाही.त्यांच्या या कृतीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, खरा वाढदिवस तोच जो दुसऱ्याच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवतो! असा भावनिक सूर नागरिकांतून उमटत आहे.

## ब्लॅक बेल्ट परिक्षा शिबीर संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव :** संकल्प स्पोर्ट्स फाऊंडेशन महाराष्ट्र व शतोकॉन चिडोकॉन कराटे इंडिया यांच्या संयुक्त विद्यमान राळेगणसिद्धी हिंगसेवा ट्रस्ट या ठिकाणी ब्लॅक बेल्ट परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. २८ विद्यार्थ्यांनी ब्लॅकबेरी परीक्षा दिली व अतिशय उत्कृष्ट असे ट्रेनिंग करून ब्लॅकबेल्ट ही पदवी मिळवली. यामध्ये प्रथम क्रमांक ओम चांदगुडे व प्रणिती पोदकुले यांना विभागून देण्यात आला. द्वितीय क्रमांक यश शिवरकर, तृतीय क्रमांक पवन शिवरकर व गौरव सूळ यांनी मिळविला. कु. किरण भिसे. सोनाली जाधव. शिव पोटे . शिव गावडे. भावेश गावडे शुभम शेलार. कार्तिक भोसले.तसेच. भाग्यश्री पोटे. जानवी. पोदकुले.अर्चना दिघे. समृद्धी शेळके. गौरी तापकीर. श्रद्धा बोके. काजल पुरी. राजनंदिनी पाचपुते. गौरी करणार. काजल बुगे. हर्षदा फुगे. श्रावणी शिंदे. स्वरूप भुजबळ. सिराज पठाण हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून व ग्रँडमास्टर म्हणून सिंहान चंद्रकांत राहिंज सर यांचे मार्गदर्शन लाभले. मेजर माऊली मापारी सागर लबडे. योगेश वागस्कर. रोहित गायकवाड, गणेश दिघे. सुरेश घालमे. अन्विता शेळके. नितीन जाधव.या प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. ब्लॅक बेल्ट पदवी समाजभूषण अण्णा हजारे यांच्या हस्ते व शिरूर येथील नगरसेवक उमेश भाऊ शेळके यांनी या मुलांना प्रदान केली. अण्णांनी या मुलांचे खूप मोठे व्हा देश सेवा करा समाजासाठी काहीतरी करून दाखवा. असा संदेश देऊन १० मे रोजी या परिक्षेचा समारोप झाला. शहान चंद्रकांत राहीन यांचा जन्मदिनही यानिमित्ताने साजरा करण्यात आला. अण्णांच्या हस्ते त्यांना आदर्श प्रशिक्षक म्हणून शाल सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## ब्रिटिश कालीन पोलीस वसाहत पाडकाम प्रकरण तापलं !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

### १५ मे ला आत्मदहनाचा इशारा

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरातील पोलीस स्टेशनलगत असलेल्या ऐतिहासिक ब्रिटिशकालीन पोलीस वसाहतीच्या कथित बेकायदेशीर पाडकाम प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. या प्रकरणात दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास १५ मे २०२६ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.

शिवाजी शंकर राऊत यांनी राज्यातील विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे की, कोणतीही अधिकृत परवानगी किंवा निर्लेखन न करता पोकलेन मशीनच्या साहाय्याने ऐतिहासिक इमारत पाडण्यात आली. एवढेच नव्हे, तर त्या इमारतीतील लाखो रुपयांचे दगड, सागवान लाकूड आणि पत्र्यांची बेकायदेशीर विक्री करण्यात आल्याचाही गंभीर आरोप त्यांनी केला आहे.या प्रकरणावर श्रीरामपूरचे आ. हेमंत ओगले यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केल्याने विषय अधिकच चर्चेत आला आहे.

मात्र, तरीही स्थानिक प्रशासन आणि संबंधित अधिकारी कारवाई करत नसल्याचा आरोप निवेदनात केला आहे. राऊत यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, दोषींवर गुन्हे दाखल करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई न झाल्यास १५ मे रोजी मुंबईत संबंधित विभागाच्या कार्यालयासमोर आत्मदहन केले जाईल. असा इशारा देण्यात आला आहे. इशाऱ्यानंतर आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे श्रीगोंद्यासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## दूषित व अनियमित पाणीपुरवठ्याविरोधात संताप

### विनाकारण रखडलेली पाणी योजना त्वरित सुरू करा : डॉ. लांडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** शेवगाव शहरात सध्या अत्यंत निकृष्ट, दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. नळाद्वारे येणारे पाणी पिवळसर व घाणीने भरलेले असून काही ठिकाणी नळातून शंख-शिंपले व कचरा येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शहरातील पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून अनेक भागात १५ ते १८ दिवसांनी पाणीपुरवठा केला जात आहे. या अनियमिततेमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

दरम्यान, शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या आमदार मोनिका राजळे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेली महत्त्वाची पाणी योजना काही लोकांनी विनाकारण बंद पाडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ही योजना सुरुवातीला चांगल्या प्रकारे सुरू होती आणि केवळ काही किरकोळ बदल सुचविण्यात आले होते. हे बदल तात्काळ दूर करून योजना सुरू ठेवली असती, तर आजपर्यंत संपूर्ण शहराची पाणी योजना पूर्णत्वाला आली असती.

नागरिकांचे म्हणणे आहे की, ही योजना वेळेत पूर्ण झाली असती तर शेवगावकर माता-भगिनींच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा उतरला असता. आज पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली नसती. तसेच शहराला टँकरवर अवलंबून राहण्याची किंवा पाणीटंचाईचा सामना करण्याची गरजच भासली नसती.

एका बाजूला विकासकामांना अडथळे निर्माण होत असताना दुसऱ्या बाजूला नगरपरिषदेकडून निकृष्ट व अनियमित पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत. दूषित पाणीपुरवठ्याची तात्काळ चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा त्वरित सुरू करावा पाणीपुरवठा नियमित वेळापत्रकानुसार करावा संपूर्ण पाईपलाईनची तपासणी करून दोष दूर करावेत रखडलेली पाणी योजना तात्काळ सुरू करून पूर्ण करावी मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन, मोर्चा व कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.



## आ. तांबेंची ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेस भेट!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** नाशिक पदवीधर मतदारसंघाचेव विधिमंडळातील अभ्यासू आ. सत्यजित दादा तांबे यांनी ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी आ. तांबे यांनी सहकार व शिक्षण महर्षी स्व. शिवाजीराव नागवडे बापू यांनी स्थापन केलेल्या या ज्ञानदीप व ग्रामीण विकास संस्थेच्या कामकाजा बाबत समाधान व्यक्त केले . नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे व जिल्हा बँकेच्या संचालिका सौ अनुराधाताई नागवडे यांनी या शिक्षण संस्थेचे कार्य अखंडपणे उत्तम प्रकारे पार पाडत आहेत. याचा अभिमान वाटतो. असे गौरवदगार आ. तांबे यांनी व्यक्त केले. यावेळी ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे इन्स्पेक्टर बी. के. लगडसर, समवेत बाजार समितीचे संचालक दीपक पाटील भोसले, मुख्याध्यापक भीमराव आनंदकर सर, तालुका संघाचे अध्यक्ष बंडोपंत मखरे सर, मुख्याध्यापक आप्पासाहेब वागस्कर, जुनी पेन्शन योजनेचे समन्वयक मुख्याध्यापक सुनील भोर सर, मुख्याध्यापक रवींद्र भोंडवे सर, श्रीगोंदा सोसायटीचे. चेअरमन अशोकराव आळेकर, मधुकरराव नागवडे, युवक नेते महेश तावरे, मुख्याध्यापक माध्यमिक शिक्षक बँकेचे चेअरमन दिलीप काटे, सह्याद्री सोसायटीचे चेअरमन राजीव कुमार साळवे व मित्रपरिवार यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलीचा बस्ता बांधून घरी परतणाऱ्या वडिलांचा मृत्यू

## खर्डा परिसरात भिषण अपघात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** मुलीच्या लग्नाची जय्यत तयारी सुरू असताना आणि आनंदाचे वातावरण असतानाच काळाने घाला घातला आहे. मुलीच्या लग्नाचा बस्ता बांधून दुचाकीवरून घरी परतत असताना समोरून येणाऱ्या भरधाव मोटारसायकलने दिलेल्या धडकेत एका पित्याचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना खर्डा गावापासून एक किलोमीटर अंतरावर घडली.महादेव लक्ष्मण फरताडे (वय ४५, रा. गोसावीवाडी, ता. परंडा, जि. धाराशिव) असे मृताचे नाव आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, महादेव लक्ष्मण फरताडे यांच्या मुलीचे लग्न निश्चित झाले होते. लग्नासाठी कपड्यांचा बस्ता बांधण्यासाठी ते खर्डा येथे आले होते. बस्ता बांधून झाल्यानंतर ते आपल्या बजाज प्लेटिना मोटारसायकलने (क्र. चक-२५-४९२३) नातेवाईक अभिषेक चव्हाण यांच्यासह भूममार्गे गावाकडे निघाले होते.

खर्डा गावापासून काही अंतरावर आले असताना, समोरून येणाऱ्या एका अज्ञात चालकाने आपल्या ताब्यातील होंडा शाईन मोटारसायकल (क्र. चक-१६-८९८२) रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अत्यंत भरधाव वेगात चालवली. या भरधाव दुचाकीने फरताडे यांच्या गाडीला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, महादेव फरताडे हे हवेत उंच उडून थेट रस्त्यावर डोक्यावर आदळले . गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

धडक दिल्यानंतर अज्ञात आरोपी चालक घटनास्थळावरून तातडीने फरार झाला. याप्रकरणी अभिषेक चव्हाण (वय १८, रा. वंजारवाडी, ता. जि. बीड) यांनी खर्डा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खर्डा पोलीस स्टेशनचे साहाय्यक पोलीस निरीक्षक उज्ज्वलसिंह राजपूत व पोलीस हवालदार संभाजी शेंडे या अपघाताचा तपास करत आहेत.




**गावावर शोककळा**

अवघ्या दोन दिवसांवर मुलीचे लग्न आले असताना, वडिलांचा असा अपघाती मृत्यू झाल्याने फरताडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कपड्यांचा बस्ता घेऊन घरी परतणाऱ्या वडिलांचा मृतदेह घरी पोहोचल्याने संपूर्ण गोसावीवाडी गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.


**रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल चितळी, ता. राहाता, जिल्हा – अहिल्यानगर**

**निविदा सूचना**

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल चितळी, ता. राहाता, जिल्हा- अहिल्यानगर हे खालील नमुद केलेल्या कामासाठी बी – १ नमुन्यामध्ये योग्य त्या नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून मोहरबंद टेंडर मागवित आहेत.

| अ. नं | कामाचे नाव | अंदाजे इस्टिमेट रक्कम | टेंडर सोबत बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | टेंडर फॉर्मची कींमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुलींच्या स्वच्छता गृहाचे बांधकाम करणे | १२,२९,१००/- | १२,३००/- | ३ महिने | २०००/- |

उपरोक्त कामासाठी कोरे टेंडर फॉर्मस् . न्यू इंग्लिश स्कूल चितळी, ता. राहाता, जिल्हा- अहिल्यानगर यांचे कार्यालयात दिनांक: १३/०५/२०२६ ते दिनांक २०/०५/२०२६ पर्यंत ऑफिस कामकाजाच्या वेळेत सुटटीचे दिवस सोडून मिळतील तसेच भरलेले टेंडर फॉर्मस दिनांक :- २२/०५/२०२६रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत. न्यू इंग्लिश स्कूल चितळी, ता. राहाता, जिल्हा – अहिल्यानगर यांचे कार्यालयात स्विकारण्यात येतील. ठेकेदारांनी टेंडर सोबत बयाणा रक्कम रोख अथवा डी. डी. व्दारे विदयालय कार्यालयात भरावी. बयाणा रकमेशिवाय टेंडरचा विचार केला जाणार नाही. कोणतीही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार. न्यू इंग्लिश स्कूल चितळी, ता. राहाता, जिल्हा – अहिल्यानगर यांनी राखून ठेवले आहेत.

**मुख्याध्यापक,**
**न्यू इंग्लिश स्कूल चितळी, ता. राहाता,**
**जिल्हा – अहिल्यानगर**
**मो.नं ९२८४२५५०७१**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
मंगळवार, दि.१२ मे २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# मार्गदर्शक, विचारवंत नेतृत्वाचे प्रतीक
# माजी खासदार यशवंतराव गडाख साहेब

*राजकारण, सहकार, शिक्षण, साहित्य, संस्कृती आणि समाजकारण या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे माजी खासदार यशवंतराव गडाख हे अहिल्यानगर जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनातील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व. त्यांच्या कार्याचा विस्तार केवळ राजकीय सत्तेपुरता मर्यादित राहिला नाही, तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आयुष्यभर झटण्याचे काम केले. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध प्रेरणादायी पैलूंना उजाळा देणे म्हणजे एका युगपुरुषाच्या कार्याला सलाम करण्यासारखे आहे....*



१२ मे १९४३ रोजी जन्मलेल्या यशवंतराव गडाख यांनी ग्रामीण भागातून पुढे येत स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. बी.एड. शिक्षण पूर्ण करून शेती व्यवसायाशी नाळ जोडलेली ठेवत त्यांनी समाजकारणाचा प्रवास सुरू केला. पंचायत समितीपासून जिल्हा परिषद, जिल्हा बँक, सहकारी साखर कारखाने आणि पुढे लोकसभेपर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास हा संघर्ष, अभ्यास आणि लोकविश्वास यांच्या बळावर उभा राहिलेला आहे.

नेवासा तालुक्यातील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत त्यांनी पुढाकार घेतला. सहकार क्षेत्राला ग्रामीण विकासाचे माध्यम मानून त्यांनी हजारो शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्याचे काम केले. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी पारदर्शकता आणि शिस्त यांना प्राधान्य दिले. सहकार हा केवळ संस्था चालवण्याचा विषय नसून तो ग्रामीण अर्थकारणाला स्थैर्य देणारा पाया आहे, ही त्यांची ठाम भूमिका होती.

यशवंतराव गडाख यांचा राजकीय प्रवासही तेवढाच प्रभावी राहिला. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येणे ही त्यांच्या लोकप्रियतेची पावती होती. लोकसभा सदस्य म्हणून त्यांनी संसदेत ग्रामीण प्रश्न, शेती, सिंचन, शिक्षण आणि सहकार यासंदर्भातील विषय सातत्याने मांडले. सत्ता हे समाजसेवेचे साधन असते, यावर त्यांचा नेहमी विश्वास राहिला.

राजकारणाच्या पलीकडे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. मुळा एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संधी निर्माण करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. शिक्षण हेच परिवर्तनाचे खरे साधन असल्याची जाणीव ठेवून त्यांनी अनेक संस्था उभ्या केल्या. ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि त्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत, यासाठी ते सदैव प्रयत्नशील राहिले.

पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीतही त्यांची भूमिका दूरदृष्टीची होती. पाणी, वृक्षसंवर्धन आणि ग्रामीण पर्यावरण याबाबत त्यांनी सातत्याने जनजागृती केली. विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखणे किती महत्त्वाचे आहे, हे ते नेहमी अधोरेखित करतात. मुळा कारखाना तसेच सोनई परिसराला भेट दिल्यानंतर त्यांनी जतन केलेल्या वृक्षसंपदेची महती पटते. ग्रामीण भागातील जलसंधारण आणि शेतीविषयक उपक्रमांमध्ये त्यांची भूमिका मार्गदर्शक स्वरूपाची राहिली.

साहित्य आणि संस्कृती क्षेत्राशी असलेली त्यांची नाळ विशेष उल्लेखनीय आहे. स्वतः उत्तम लेखन करणारे आणि साहित्यिकांचा सन्मान करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. 'अर्धविराम', 'अंतर्वेध' आणि 'सहवास' यांसारख्या पुस्तकांमधून त्यांनी जीवन, समाज आणि माणुसकी यांचे चिंतन मांडले. त्यांच्या साहित्यकृतींना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. साहित्य संमेलनांच्या आयोजनात त्यांनी घेतलेला पुढाकारही महत्त्वाचा ठरला. अहिल्यानगरमध्ये साहित्यिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले.

मराठी साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, सांस्कृतिक महोत्सव यामध्ये त्यांनी घेतलेला सक्रिय सहभाग त्यांच्या सांस्कृतिक जाणिवेची साक्ष देतो. राजकारण करताना साहित्य आणि संस्कृतीपासून दूर न जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

आजच्या पिढीतील नवोदित कार्यकर्त्यांसाठी यशवंतराव गडाख यांचे जीवन म्हणजे एक प्रेरणादायी विद्यापीठ आहे. संघर्षातून उभे राहताना समाजाचे भान कसे जपायचे, सत्तेचा उपयोग लोकहितासाठी कसा करायचा, विकास करताना संस्कृती आणि मूल्ये कशी जपायची आणि माणुसकीला केंद्रस्थानी ठेवून नेतृत्व कसे घडवायचे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे यशवंतराव गडाख.

शून्यातून विश्व निर्माण करताना आपल्या समाजाप्रती असलेल्या कर्तव्याचे भान जपणे किती महत्त्वाचे असते, हे त्यांच्या संपूर्ण जीवनप्रवासातून स्पष्टपणे जाणवते. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व हे केवळ एका राजकारण्याचे नसून समाजाला दिशा देणाऱ्या विचारवंत नेतृत्वाचे प्रतीक ठरते. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना मानाचा मुजरा!

**दीपक साखरबाई**
**बाबासाहेब नवले पाटील**
चीफ इंजिनियरः मुळा सहकारी साखर कारखाना, सोनई

# शिऊर बंगला येथे भीषण आग
## हॉटेलसह आठ ते दहा दुकाने जळून खाक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील शिऊर बंगला येथे सोमवारी (दि. ११ मे) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत हॉटेल, गॅरेज व इतर मिळून आठ ते दहा दुकाने जळून खाक झाली. या दुर्घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, शासकीय विश्रामगृहासमोरील एका गॅरेजला पहाटे अचानक आग लागली. पहाटेची वेळ असल्याने सुरुवातीला ही बाब कुणाच्याही लक्षात आली नाही.

दरम्यान, गॅरेजमधील ज्वाळांनी काही क्षणांतच शेजारील हॉटेल व दुकानांना वेढा घातला. लाकडी साहित्य, गॅस सिलिंडर, फर्निचर, टपऱ्यांमधील ज्वलनशील साहित्य यामुळे आगीने विक्राळ रूप धारण केले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, व्यावसायिक व तरुणांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीचा वेग प्रचंड असल्याने ती नियंत्रणाबाहेर गेली. खबरदारीचा उपाय म्हणून शेजारील दुकानदारांनी तातडीने आपले साहित्य बाहेर काढून दुकाने खाली केली. त्यामुळे आणखी मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, पेट्रोलिंगवर असलेले शिऊर पोलीस ठाण्याचे कर्मचारी सुभाष ठोके यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत सहकाऱ्यांच्या मदतीने छत्रपती संभाजीनगर व वैजापूर येथील अग्निशामक दलाला पाचारण केले.

जवळपास तासाभरानंतर दोन्ही अग्निशामक बंब घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाने अथक प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. त्यामुळे शेजारील आणखी काही हॉटेल व दुकाने आगीपासून वाचली. या भीषण आगीत टपऱ्या, गॅरेज, हॉटेल तसेच विविध दुकाने पूर्णतः जळून खाक झाली. व्यावसायिकांचे रोख रक्कम, फर्निचर, इलेक्ट्रिक साहित्य, खाद्यपदार्थ, फ्रीज, मोटारसायकल दुरुस्तीचे साहित्य व अन्य वस्तू जळाल्याने लाखोंचे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, नेमके कारण समजू शकले नाही. घटनेची माहिती मिळताच आमदार प्रा. रमेश बोरनारे, सहायक पोलीस निरीक्षक वैभव रणखांब ,राहुल थोरात.यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच नुकसानग्रस्त व्यावसायिकांना धीर देत प्रशासनाकडून मदतीबाबत आश्वासन दिले. या आगीत सुरेश तुपे, नंदू जाधव, कांतिलाल राजपूत, अंबादास निकम, संजय बोरसे, मयूर निकम, श्रीकांत चव्हाण, अश्विन जाधव व गणेश घोगरे या व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेचा पुढील तपास शिऊर पोलीस करीत आहेत.

आठ दशकं विकासाच्या ध्यासासाठी..
माणुसकीच्या नात्यांसाठी..
आपल्या मातीच्या सन्मानासाठी..

सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि
सहकार क्षेत्रात भरीव कार्य करणारे,
दूरदृष्टी, सुसंस्कृती व समाजभान लाभलेले लोकप्रिय नेते

**मा.खा. यशवंतरावजी गडाख साहेब**
यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा !




- शुभेच्छुक -
मा. शंकरराव गडाख पाटील युवा मंच
नेवासा तालुका

जाहीरात संकलन : श्री.विजय खंडागळे, सोनई, मोबा. ९८६०३ ८८३९२

# बेलापूर एज्युकेशन सोसायटी फसवणूक प्रकरणी फौजदारीचे संकेत

## सभासदांची १८ रोजी बैठक

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** बन्सीलाल रघुनाथ दास झंवर या ट्रस्ट कडून गोपाल अजित कुमार झंवर व शरद रामबिलास सोमाणी यांनी संस्थेची व संस्थेच्या सभासदांची फसवणूक केली असून यांच्याविरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी बेलापूर एज्युकेशन सोसायटीच्या चार सदस्यांनी सोसायटीचे मावळते अध्यक्ष अशोक साळुंके यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात साळुंके यांनी पाऊल उचलले नाही तर संपूर्ण कार्यकारी मंडळ या गैर कृत्यात सामील आहे, असे समजून सोमाणी आणि झंवर यांच्यासह कार्यकारी मंडळाच्या विरोधात कायदेशीर मार्गाने फौजदारी करण्याचा इशारा सुभाष बोरा, श्रीकांत राठी, शिवदास महाडिक आणि राजेंद्र सिकची या चार सदस्यांनी आहे.

येत्या आठ दिवसात ही कारवाई करावी, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे. नवीन विश्वस्त मंडळ अस्तित्वात आल्यानंतर सन २०२१ ते २०२३ तसेच २०२३ ते २०२५ अशा कालावधीसाठी हे कार्यकारी मंडळ कार्यान्वित होते. दरम्यान काही सदस्यांनी नगरच्या धर्मादाय आयुक्त कार्यालयात बन्सीलाल रघुनाथ झंवर ट्रस्ट ची माहिती घेतली आणि ती अस्तित्वात नसून ट्रस्टवर कोणीही सदस्य नसल्याचे उघड झाले. गोपाल झंवर यांनी ट्रस्ट नसताना स्वतःला ट्रस्टी भासवून तसेच त्यांचेच नातेवाईक असलेले शरद सोमाणी यांना सन २०१९ मध्ये ट्रस्टचे प्रतिनिधी म्हणून संस्थेच्या कामकाजात भाग घेण्यासाठी नेमले.

गोपाल झंवर आणि शरद सोमाणी यांनी संगणमताने संस्थेची फसवणूक केल्याप्रकरणी सभासदांमध्ये संस्थेतील चालू असलेल्या या अनागोंदी व बेकायदेशीर कृत्यांमुळे संभ्रमाचे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी संस्थेचे अध्यक्ष श्री साळुंके यांनी या फसवणुकीच्या कृत्याबाबत कार्यकारी मंडळाशी चर्चा करावी तसेच या प्रकरणाबाबत झंवर आणि सोमाणी यांचे विरुद्ध तात्काळ कारवाई करावी अशी मागणी करत सचिव पदाच्या काळात शरद सोमानी यांनी घेतलेले सर्व ते निर्णय आणि ठराव तात्काळ रद्द करावेत अशी ही मागणी या सदस्यांनी केली आहे.

# वाढत्या उष्णतेने लग्नसराईत मठ्ठ्याची वाढती क्रेझ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** सध्या जिल्ह्यासह ग्रामीण भागात लग्नसराईचा हंगाम सुरू असून, त्याबरोबर राज्यात उन्हाचा पारा ४२ ते ४५ अंश सेल्सिअसवर पोहचल्याने नागरिक उष्णतेने हैराण झाले आहे. विशेषतःभरदुपारी पार पडणाऱ्या विवाह सोहळ्यांमध्ये उकाड्यामुळे अंगाची अक्षरशः लाही-लाही होत आहेत.



अशा परिस्थितीत लग्न समारंभात पाहुण्यांसाठी दिला जाणारा थंडगार मठ्ठा मोठा दिलासादायी ठरत आहेत.अहिल्यानगर जिल्ह्यात एकीकडे तापमानात मोठी वाढ झाली असतानाच दुसरीकडे गावागावांत विवाह सोहळ्यांच्या तारखा दाट असल्यामुळे चोहीकडे धामधूम पाहायला मिळत आहेत.

**वाह क्या बात है!**
तुम्ही मसालेदार मठ्ठा प्यायला तर, तुम्हाला त्याचे आरोग्यदायी फायदे मिळतील. जर मठ्ठा मटक्यातील असेल तर मग,आपण उन्हाळ्यात वाह क्या बात है! हे वाक्य निश्चित आपण म्हणतोय....

लग्न सोहळा हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण मानला जातो.त्यामुळे पाहुण्यांची उत्तम खातारदारी करण्यावर विशेष भर दिला जात आहे.उन्हाळ्याचे दिवस असल्याने लग्न वेळेत पार पडावे, यासाठी वधू-वर पक्षाच्या नातेवाईकांची मोठी धावपळ सुरू असल्याचे चित्र आहेत.

यातच भरदुपारी कडक उन्हात नवरदेवाची मिरवणूक काढल्यानंतर अनेक पाहुणे आणि वऱ्हाडी मंडळी घामाघूम होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे विवाहस्थळी पोहोचताच पाहुण्यांकडून सर्वप्रथम थंडगार मठ्ठ्याची मागणी होत आहेत. पारंपरिक पद्धतींसोबतच मंगल कार्यालयांमध्येही विवाह सोहळे मोठ्या उत्साहात पार पडत आहेत. तीव्र उन्हामुळे तेलकट आणि जड जेवणाला तुलनेने कमी प्रतिसाद मिळत असल्याचेही दिसून येत आहेत. पूर्वीपासूनच लग्नसराईत मठ्ठ्याला विशेष महत्त्व आहे.ग्रामीण भागातील भर उन्हात सुरू असलेल्या लग्नांमध्ये पाचपक्वान्नांचा बेत असला तरी पाहुण्यांकडून सर्वप्रथम मठ्ठा आहे का? अशी विचारणा होताना दिसत आहेत.

जेवण नंतर करू, आधी थंडगार मठ्ठा द्या, अशी मागणी अनेक लग्न समारंभांमध्ये पाहायला मिळत आहे. दही, ताक, साखर,काळे मीठ, पुदिना, कोथिंबीर, बर्फ तसेच विविध मसाल्यांचा वापर करून खास थंडगार मठ्ठा तयार केला जात आहे. काही ठिकाणी चव वाढवण्यासाठी जिरे आणि हिरवी मिरचीचाही वापर केला जात असून या पारंपरिक पेयाला पाहुण्यांकडून मोठी पसंती मिळत आहे.उच्च तापमानामुळे घामाघूम झालेल्या पाहुण्यांना थंडगार मठ्ठा पिल्यानंतर मोठा दिलासा मिळत असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.

शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी तसेच उन्हाच्या झळांपासून आराम मिळावा यासाठी मठ्ठ्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.